शुक्रवार, ९ डिसेंबर २०२२
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -११५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●FRIDAY 09 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-115 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-5


# भाजपच्या विजयाची सप्तपदी

## गुजरातमध्ये सलग सातव्यांदा विजयाचा विक्रम



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : गुजरात विधानसभेचा निकाल भाजपसाठी ऐतिहासिक असाच ठरला असून भाजपने सर्व जुने विक्रम मोडून तब्बल 157 जागांवर विजय मिळवला आहे. मतांच्या टक्केवारीचेही जुने विक्रम मोडत भाजपने तब्बल 53 टक्के मतं मिळवली आहेत. भाजपला मिळालेल्या या मोठ्या विजयानंतर राजकीय विश्लेषकांनीही आश्चर्य व्यक्त केलं आहे. नरेंद्र मोदी मुख्यमंत्री असतानाही भाजपला इतक्या मोठ्या प्रमाणात यश मिळालं नव्हतं. तसेच काँग्रेसला या निवडणुकीत फक्त 16 जागा तर आम आदमी पक्षाला आतापर्यंत केवळ पाच जागांवर विजय मिळवता आला.**

भाजपने यंदाच्या निवडणुकीत या आधीचे सर्व जुने विक्रम मोडले आणि तब्बल 53 टक्क्यांहून अधिक मतं मिळवली. 2002 सालच्या निवडणुकीत 49.85 टक्के, 2007 साली 49.12 टक्के आणि 2012 साली 47.85 टक्के मतदान भाजपने मिळवले होते. यंदा त्यापेक्षा अधिक मतदारांनी भाजपच्या पारड्यात आपली मतं टाकली.

सन 2001 साली मोठ्या राजकीय घडामोडींनंतर भाजपने नरेंद्र मोदी यांना मुख्यमंत्री केलं. त्यानंतर 2002 साली झालेल्या निवडणुकीत भाजपने 127 जागांवर विजय मिळवला होता. त्या आधी 1998 साली भाजपला 117 जागा मिळाल्या होत्या. यंदाच्या निवडणुकीत भाजपने त्यांच्या हा जुना विक्रम मोडला असून 157 जागा मिळवल्याचं स्पष्ट झालं आहे.

मोदींचा गुजरात मॉडेलवर विजय, पण जागा घटल्या

सन 2002 सालच्या निवडणुकीनंतर भाजपने गुजरात मॉडेलच्या आधारे आणि त्यावेळचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली निवडणुका जिंकल्या, पण भाजपच्या जागांमध्ये सातत्याने घट होताना दिसली. सन 2007 साली भाजपला 117 जागा मिळाल्या, त्यानंतर 2012 साली 115, जागा मिळाल्या. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर 2017 साली झालेल्या गुजरात निवडणुकांमध्ये भाजपच्या जागा शंभरीच्या आत आल्या. त्यावेळी भाजपला 99 जागा मिळाल्या होत्या. गेल्या निवडणुकीत काँग्रेसने भाजपसमोर मोठं आव्हान निर्माण करत 77 जागांवर विजय मिळवला होता.

यंदाच्या निवडणुकीत मात्र काँग्रेसला केवळ 17 जागांवर यश मिळवता आलं आहे. सन 1985 च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने तब्बल 149 जागांवर विजय मिळवला होता. काँग्रेसचा हा विक्रम यंदा भाजपने मोडीत काढला आहे.

यंदाच्या निकालानंतर काँग्रेसला राज्यातील विरोधी पक्षनेतेपदही मिळणार नाही हे आता स्पष्ट झाले आहे.

### हिमाचलमध्ये काँग्रेसचा दणदणीत विजय

हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसने एकहाती सत्ता स्थापन केली आहे. काँग्रेस पक्षाला विजयाचा आनंद आहे पण घोडोबाजाराची भिती कायम आहे. ऑफरेशन लोट्सची भिती काँग्रेसला आहे, त्यामुळे आमदारांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलेय. छत्तीसगढचे मुख्यमंत्री बूपेश बघेल म्हणाले की, भाजप कोणत्याही स्तराला जावू शकते. त्यामुळे आमदारांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे लागेल. गेल्या काही वर्षात पाहिले तर काँग्रेसला काही राज्यात सत्तेतून बाहेर बसावे लागले. नुकतेच महाराष्ट्रात काय झाले ते देशाने पाहिले. शिवसेनेच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी सरकार कोसळले होते. 2018 मध्ये मध्य प्रदेशात 15 वर्षानंतर काँग्रेस सत्तेत आली होती. कमलनाथ यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती. त्यानंतर काँग्रेसच्या ज्योतिरादित्य शिंदे यांनी बंड केला. याचा भाजपनं फायदा घेत सत्ता स्थापन केली. 2017 मध्ये मणिपूरमध्ये काँग्रेसनं निवडणूक जिंकली होती. काँग्रेसकडे 28 तर भाजपकडे 21 जागा होत्या. पण काँग्रेसमधून बंडखोरी झाली अन् याचा फायदा भाजपने घेतला. 2017 मध्ये गोव्यातही असेच झाले होते. काँग्रेसला सत्तेपासून दूर राहावे लागले. 10 आमदारांनी एकत्र राजीनामा दिला. येथेही भाजपने सत्ता स्थापन केली. 2016 मध्ये उत्तराखंडमध्ये काँग्रेस सरकारच्या 9 आमदारांनी बंडखोरी केली. राज्यपालांनी राष्ट्रपती राजवट लागू केली. या 9 आमदारांच्या मागे भाजपचा हात असल्याचा आरोप करण्यात आला. त्यानंतर काही दिवसांनी त्या 9 बंडखोर आमदारांनी भाजपात प्रवेश केला.

# संपत्ती मुलांच्या नावावर करण्याआधी सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय वाचा

आधुनिक केसरी न्यूज


**नवी दिल्ली :** मुलांच्या नावे संपत्ती करताना मुलांकडून म्हातारपणी काळजी घ्यावी, अशी अट लिखित स्वरुपात लिहून घ्यावी, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. अन्यथा मुलांनी त्यांच्या वृद्ध पालकांकडे दुर्लक्ष केल्यास पालकांनी केलेले गिफ्ट डिड रद्द होऊ शकत नाही.

न्यायमूर्ती संजय के. कौल आणि ए. एस. ओका यांच्या खंडपीठाने ज्येष्ठ नागरिकांना हा सल्ला दिला आहे. अनेकदा ज्येष्ठ नागरिकांना मुले आजारपणात व वृद्धापकाळात त्यांची देखभाल करतील, अशी आशा असते. मुलांकडून त्यांना फार अपेक्षा असतात त्यामुळे मुलांच्या प्रेमापोटी ते स्व-कमाईतून कमावलेली मालमत्ता त्यांच्या नावे करतात. वृद्धापकाळात मुले पालकांकडे दुर्लक्ष करतात. अशावेळी ज्येष्ठ नागरिकांची देखभाल आणि कल्याण कायदा, २००७ लागू करणाऱ्या समर्पित न्यायाधिकरणाकडे जाण्याचा अधिकार असला आहे. मात्र, तरीही हा निकाल मुलांना गिफ्ट डीडच्या म्हणून दिलेली मालमत्ता रद्द करण्यावर होती. त्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. न्यायमूर्ती संजय ओका यांनी सुनावणीदरम्यान २००७ कायद्याच्या कलम २३चा अभ्यास करत एक महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले आहे. यावेळी ते म्हणाले की, या कायद्यांतर्गत दोन अटी पूर्ण केल्या पाहिजेत. त्यातील एक म्हणजे मालमत्ता मुलांच्या नावे प्रदान केलेल्या अटीच्या अधीन राहून हस्तांतरण केले गेले पाहिजे. तसेच, हस्तांतरणकर्त्याला मुलभूत सुविधा आणि मुलभूत गरजा मिळाव्यात. तर, दुसरी अट म्हणजे ज्याच्या नावावर संपत्ती हस्तांतरित केली आहे तो हस्तांतरणकर्त्यांला अशा सुविधा आणि भौतिक गरजा प्रदान करण्यात नकार देतो आणि अपयश ठरतो. वरील दोन्ही अटी पूर्ण न झाल्यास, कायद्यानुसार हस्तांतरण फसवणूक किंवा जबरदस्तीने किंवा अवाजवी प्रभावाने केले गेले आहे असे मानले जाईल. असे हस्तांतरण नंतर हस्तांतरणकर्त्याच्या विनंतीनंतर रद्द करण्यायोग्य बनते आणि देखभाल न्यायाधिकरणाला हस्तांतरण रद्द म्हणून घोषित करण्याचा अधिकार प्राप्त होतो (जर मुलांनी त्यांना मालमत्ता भेट दिलेल्या पालकांची काळजी घेतली नाही), असं न्यायालयाने नमूद केले आहे. गुरुग्राममधील एका आईने तिच्या मुलांना काही मालमत्ता भेट दिल्या होत्या. त्यानंतर मुले तिची काळजी घेत नसल्याचा आरोप करून तिने नंतर गिफ्ट डीड रद्द करण्यासाठी मेंटेनन्स ट्रिब्युनलकडे धाव घेतली. न्यायाधिकरणाने आरोप खरे ठरल्यानंतर आणि मे २०१८ मध्ये गिफ्ट डीड रद्द केले. पंजाब आणि हरियाणा हायकोर्टाने न्यायाधिकरणाच्या निर्णयाशी सहमती दर्शवली आहे.









विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

माझ्या उगवतीचे रंग या सदराचे विविध विषय असतात हे आपण जाणत. आजचे उगवतीचे रंग मात्र कृतज्ञतेच्या रंगात रंगलेले आहेत. माझ्या जीवनात नुकत्याच घडून गेलेल्या एका घटनेच्या निमित्ताने मी ही कृतज्ञता व्यक्त करतो आहे. खरं तर आजचा लेख हा नेहमीप्रमाणे एखाद्या विशिष्ट विषयावर लिहिलेला लेख नाही तर या घटनेच्या निमित्ताने मी तुमच्याशी साधलेला मनमोकळा संवाद आहे. माझ्या भावना तुमच्यापर्यंत पोहोचवाव्या इतकाच हेतू या लेखनाचा आहे. आपल्या मनातील गोष्टी एखाद्याला सांगितल्या की जसे आपल्याला मोकळे वाटते तीच भावना यामागे आहे. लेखनाच्या निमित्ताने माझी शेकडो व्यक्तींशी जिव्हाळ्याची नाती जोडली गेली. लेखकआणि वाचक एवढीच ती मर्यादित राहिली नाहीत. ही नाती रक्तापलीकडची आणि प्रसंगी रक्ताच्या नात्यापेक्षाही बळकट असणारी असतात याचा अनुभव मी घेतला आहे, घेतो आहे.

## फक्त आणि फक्त कृतज्ञता



प्रसंग आहे २ डिसेंबर २०२२ चा. मी नाशिकला एका मुंजीच्या कार्यक्रमासाठी गेलो होतो. तो कार्यक्रम आटोपून मी आणि माझी पत्नी सौ. श्रद्धा असे आम्ही दोघे कारने चाळीसगावकडे परत येण्यासाठी निघालो. आम्ही निफाड, लासलगाव, मनमाड मार्गे चाळीसगावला येत होतो. मनमाड येथे राहणाऱ्या डॉ वसुधा डोंगरगावकर यांचे माझे लेखनाच्या निमित्ताने संबंध आले. क्वचित आमचे फोनवर संभाषण होत असे. माझ्या लेखांना त्यांच्याकडून अभ्यासपूर्ण अशी प्रतिक्रिया येई. त्या त्यांचेही लेख मला पाठवत. मध्यंतरी त्यांनी गायिलेली काही गाणी देखील मला पाठवली होती. वसुधाताईंची प्रत्यक्ष कधी भेट झालेली नसली तरी आम्हाला एकमेकांची कधीतरी भेट व्हावी असे वाटत होते. त्यांच्याबद्दल माझ्या मनात आदराचे स्थान होते. त्या दिवशी मला वेळ असल्याने मी त्यांना भेटायला जाण्याचा विचार केला. पण ती दुपारची वेळ असल्याने त्यांच्याकडे अशा अवेळी जाणे मनाला योग्य वाटत नव्हते. त्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधला. पण वसुधाताईंनी याच म्हणून आग्रह केला आणि आम्ही त्यांच्याकडे जाण्याचे ठरवले. **क्रमशः**



## आनंदी पहाट

## श्रेष्ठत्व आर्थिक बळावर ठरवू नये

आधुनिक केसरी

एकाच घरातील, एकाच कुटुंबातील प्रत्येक सदस्यांत देखील अशी जीवघेणी स्पर्धा सुरु असल्याचे अनेक ठिकाणी पाहायला मिळते. दोन भावंडांमध्ये एका भावाने चारचाकी गाडी घेतली कि दुसऱ्याच्या दारांत अधिक महागडी गाडी उभी राहतेच. एकमेकांमध्ये, मोठा मीच, हे सिद्ध करण्याची जीवघेणी स्पर्धा सुरु रहात असते. अनेकदा आपल्या आवाक्याबाहेर जाणाऱ्या किमतीची गाडी घेऊन आर्थिक विवंचनेत सापडल्याची उदाहरणे पाहायला मिळतात. गाडीच्या सुखापासून वंचित राहायला लागून, गाडी विकत घेण्यासाठी मिळवलेल्या लोन, त्यांचे फोन ह्याच चक्रव्यूहात सापडलेल्याचे डोके चक्रावून जाते. आपण जे नाही आहोत, ते आहोत हे दाखवण्यात अहंकार आणि दंभ वाढतो, आर्थिक लकवा आणि मानसिक थकवा नैराश्याच्या दिशेने मार्गक्रमण करायला लागतो. कौटुंबिक विजय मिळवण्याच्या जीवघेण्या स्पर्धेत आभासी दुनियेतील मोठेपण प्राप्त झाल्यासारखे जरी वाटत असले, तरीही प्रत्यक्षांत परस्परांतील नातेसंबंधातून सर्वांना सुख, समाधान आणि मनःशांती प्राप्त होणे जरुरीचे असते. सद्यःस्थितीत समाजातील श्रेष्ठत्व आर्थिक बळावर ठरत असल्याचे सर्वत्र दिसून येते. आर्थिक पातळीवर जो ज्येष्ठ तोच समाजात श्रेष्ठ असल्यामुळे त्या जेष्ठत्व, श्रेष्ठत्व प्राप्तीसाठी खूपच मोठी स्पर्धा लागलेली असते. ही स्पर्धा आणि स्पर्धेचे स्वरूप कसेही असले, तरीही त्यांत उतरणाऱ्या स्पर्धकास त्याची जाणीवच नसते. त्याच्या दृष्टीकोनातून तो स्वतः धनाढ्य होणे, हेच महत्वाचे असते. आर्थिक विजयासाठी पत्करलेला मार्ग कसा आहे? आपला त्या संबधीचा विचार, वर्तन आणि व्यवहार योग्य आहे का? आर्थिक विजयासाठी पाण्यासारखा पैसा खर्च करणे भूषणावह वाटत असते. अनधिकृत आणि अवैधरीत्या आर्थिक विजय मिळवणे कौतुकास्पद ठरू शकते का? एकूणच प्रत्येक जीवघेण्या स्पर्धेचे आणि त्याच्या परिणामांचे गांभीर्य नसणे हीच खरे तर उणिव म्हणावी लागेल.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## तुझ्याशी जुळली | नाळ देवा ||

भेटता विठ्ठला | आनंद मावेना ||
निर्गुण सगुणा | भेट झाली ||१||
आता भेद कैसा | उरला न मनी ||
हाच चक्रपाणी | वेष्णवांचा ||२||
अनंत जन्माच्या | पुण्याईचे फळ ||
नाम सर्व काळ | मुखी तुझे ||३||
मावळला स्वार्थ | मी पण गळाले ||
आता तेजाळले | ज्ञानदिप ||४||
मोह माया सारी | जळोनिया गेली ||
तुझ्याशी जुळली | नाळ देवा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी


### भक्ती

मना, रूप ते अम्बिकेचे स्मरावे
मना, रूप ते अम्बिकेचे स्मरावे
तुझे मागणे जे, तिला तू वदावे |
मनुष्यां न काही, तुवा रे वदावे
खरे एक बाळा, तिने जे दिले ते ||



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर


## कल्पना थांबून वृत्ति स्थिर झाली पाहिजे



आधुनिक केसरी

एखादा मनुष्य तालुक्याच्या ठिकाणी गेला, आणि त्याला 'तुम्ही कुठले' असे विचारले, तर तो आपल्या खेडेगावचे नाव सांगेल. जिल्ह्याच्या ठिकाणी गेला तर तालुक्याचे नाव सांगेल, इलाख्याच्या ठिकाणी गेला तर जिल्ह्याचे नाव सांगेल; तसेच दुसऱ्या प्रांतात गेला तर आपल्या इलाख्याचे नाव सांगेल, आणि परदेशात गेला तर आपल्या देशाचे नाव सांगेल. म्हणजे मनुष्याच्या ठिकाणी जेवढी विशालता येईल तेवढे भेदभाव कमी होतात. तसे, मनुष्य कोणत्याही धर्माचा असला तरी सर्व धर्मांचे मूळ एकच असल्यामुळे, त्या मुळाशी जो गेला त्याला सर्व धर्म सारखेच. पण एवढी विशाल दृष्टी येईपर्यंत, जो ज्या धर्मात जन्माला आला त्या धर्माचे आचरण करणे हेच हिताचे असते. सुख मिळविण्याच्या आपल्या सर्व कल्पना आज खोट्या ठरल्या आहेत. आपण प्रथम अशी कल्पना केली की, श्रीमंतीमध्ये सुख आहे. त्याप्रमाणे रगड पैसा मिळविला तरी आपल्याला जर सुख मिळाले नाही, तर तर आपली कल्पना खोटी होती असे म्हणायला काय हरकत आहे ? एकच वस्तू एकाला सुखरूप तर दुसऱ्याला दुःखरूप वाटते; म्हणजे ती वस्तू मुळात दोन्ही नाही, सुखरूप नाही किंवा दुःखरूपही नाही. जी वस्तू आज आपल्याला सुखाची वाटते, ती उद्या तशी वाटेलच असे नाही. आपली बुद्धी स्थिर नसल्यामुळे आपली कल्पनाही स्थिर नाही. म्हणून त्याच वस्तूमध्ये सुख आहे ही कल्पनादेखील खोटीच असली पाहिजे; ती तेवढी खरी आहे असे आपण का म्हणावे ? जगातली आपली नाती आपण कल्पनेनेच लावतो. ती नाही म्हणायला किंवा विसरायला आपणच तयार होतो. आपल्यावर संकट आले की आपल्याला पूर्वीच्या गोष्टी, नाती, वगैरे गोड लागत नाहीत. त्यावेळी आपल्याला चैन पडत नाही. हा सर्व कल्पनेचाच खेळ आहे. एका काट्याने दुसरा काटा काढावा आणि नंतर दोन्ही टाकून द्यावेत; त्याप्रमाणे एका कल्पनेने दुसरी कल्पना मारावी आणि शेवटी दोन्ही कल्पना नाहीशा कराव्यात. कल्पना करायचीच तर ती भगवंताविषयी करू या. भगवंत हा दाता आहे, त्राता आहे, सुख देणारा आहे, अशी कल्पना आपण करू या. त्यात खरे हित आहे, आणि त्यानेच संसार खरा सुखाचा होईल. कल्पनेचे खरे-खोटेपण हे अनुभवाअंती कळते; म्हणून अनुभवानंतर कल्पना थांबली पाहिजे. अशी रीतीने कल्पना थांबल्यावर आणि वृत्ती स्थिर झाल्यावर तिला स्थिर वस्तूवर चिकटवून ठेवली पाहिजे. भगवंत ही अशी एकच स्थिर वस्तू आहे. " अमुक एक वस्तू मजपाशी आहे म्हणून मी सुखी आहे, " या वृत्तीमध्ये राम नसून , काही नसताना वृत्तीचे समाधान टिकले पाहिजे, आणि वृत्ती भगवंतापाशी स्थिर झाली पाहिजे. हेच परमार्थाचे खरे मर्म आहे. कल्पना म्हणजे मायेचे हत्यार . कल्पनारहित थोडे नामदेखील फळ देईल .

## मनाचे श्लोक



आधुनिक केसरी

**जगीं द्वादशादीत्य हे रुद्र आक्रा।**
**असंख्यात संख्या करी कोण शक्रा।**
**जगी देव धुंडाळिता आडळेना।**
**जनी मुख्य तो कोण कैसा कळेना।।१७६।।**

**श्लोकार्थ :** विश्वामध्ये बारा आदित्य आहेत. अकरा रुद्र आहेत. इंद्राची संख्या तर खूपच आहे, त्यांची गणना करणे कठीण आहे. देवतांच्या समुदायात देवाचा शोध केला तर तो आढळत नाही. सर्व देवांचा मुख्य कोण हे कळत नाही.

**विवेचन :** आपण ज्यांना देवाधिदेव म्हणतो त्यांचा पालनकर्ता कोणीतरी आहे आणि तोच खरा देव आहे असे आपण मागील श्लोकात अभ्यासले.

जगात तेहतीस कोटी आहे सनातन वैदिक हिंदू धर्म मानतो. हे तेहातीस कोटी देव म्हणजे तेहतीस पातळ्यांवरचे देव आहेत. इथे हे ध्यानात घेतले पाहिजे की कोटी हा शब्द लक्ष, कोटी, दशकोटी, अब्ज अशांसारखा संख्यावाचक म्हणून इथे योजलेला नाही. अनेक लोक 'तेहतीस कोटी' चा अर्थ 'तेहतीस करोड' असाच घेत असतात. पण मुळात संस्कृत मध्ये "कोटी" या शब्दाचा अर्थ करोड नसून 'स्तर' किंवा 'पातळी असा आहे. आपण पराकोटी हा शब्द याच भावाने वापरतो.

आपल्या सद्गुरूंना आपण अनंत कोटी ब्रम्हांड नायक अशी उपाधी लावतो. या अनंत ब्रम्हांडातील आपली पृथ्वी म्हणजे सृष्टीचा कितवा भाग असेल ? थोडक्यात ही अनंत ब्रम्हांडे सांभाळण्यासाठी महादेवाने काही व्यवस्था केली आहे. त्यांमध्ये ८ वसू, ११ रूद्र, १२ आदित्य, २ अश्विनीकुमार अशी तेहतीस कोटींची व्यवस्था आहे. याचे ज्ञान करून घेणे तसे सोपे नाही. त्या कोटीची साधना आपल्याकडून व्हावी अशी समर्थांची अपेक्षा असेल.

बारा आदित्य । अक्रा रुद्र । नव नाग सप्त ऋषेश्वर । नाना देवांचे अवतार । ऐलिकडे ॥ दास. ०८.०४.५२ ) ( बारा आदित्य, अकरा रुद्र, नवनाग, सप्तर्षी, नाना देवांचे अवतार या सर्व गोष्टी अलीकडील आहेत. )

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

देवाच्या बऱ्याच व्याख्या आपल्याकडे केल्या गेल्या आहेत. त्यातील एक आहे, देणारा तो देव. हीच व्याख्या प्रापंचिक मनुष्याला सोयीची वाटते. देव देतो म्हणून हा मागत बसतो. एक छोटीशी गोष्ट आहे. एका मनुष्याला देव प्रसन्न होतो. देव म्हणतो की तू जे मागशील ते मी देईनच. पण माझी एक अट आहे. तू मागशील त्याच्या दुप्पट तुझ्या शेजाऱ्याला मिळेल. हा मनुष्य काय मागत असेल ? तो म्हणतो, देवा माझा एक डोळा फोड. मला सांगा, असे भक्त आणि असे देव असतील तर त्याचा उपयोग कोणाला ??

प्रत्येकाच्या संसारात काही न काही न्यून असते तसे अधिक ही असते. पण गावातल्या बापदेवाला नवस बोलायचा आणि लेकीचं लग्न लावायचं, ह्याला काय भक्ती म्हणायची. आहे त्या परीस्थितीत स्वाभिमानानी आणि समाधानानी जगता येणं महत्वाचे. जो असे जगायला प्रवृत्त करतो तोच खरा सद्गुरु किंवा खरा 'महा'देव. मनुष्य मात्र नवसाला पावणारा, स्वयंभू, कुलदैवत, ग्रामदैवत अशी बिरुदं मिरवणाऱ्या देवांच्या मागे धावतो. आधी सांगितल्याप्रमाणे ही भक्तीची निव्वळ सूज आहे, असेच म्हणावे लागेल. आधी फक्त पंढरीची वारी होती, आता भरपूर 'वाऱ्या', 'पदयात्रा 'सुरू झाल्या आहेत आणि पुढेही होतील, परंतु वारी नक्की करायची याचे मर्म जर मनुष्याला कळले नाही त्या फक्त प्रभातफेऱ्या होणार, नाही का ?

कितीही सूर्य, रुद्र किंवा इंद्र असले तरी जोपर्यंत आपले अंतरंग बदलण्याचे आपण ठरवत नाही तोपर्यंत ही पूजा म्हणजे एक कर्मकांड किंवा काम ( जे मनुष्य उरकत असतो...! ) च राहणार. खरा देव आपल्या अंतरातच आहे, मनुष्याने त्याचा शोध घ्यायला हवा. टीप :अष्टवसूंची नावे – आप, धृव, सोम, धर, अनिल, अनल, प्रत्यूष आणि प्रभास. अकरा रूद्रांची नावे – हर, बहुरूप, त्र्यंबक, अपराजित, वृषाकपि, शंभू, कपर्दी, रैवत, मृगव्याध, शर्व आणि कपाली बारा आदित्यांची नावे – अंशुमान, अर्यमन, इंद्र, त्वष्टा, धाता, पूषन, भग, मित्र, वरूण, सविता, विवस्वान व विष्णू.दोन अश्विनीकुमार – नासत्य आणि दस्त्र

# ब्रेक फेल झालेल्या एसटीने दुचाकींना चिरडत घेतला पेट



आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** येथील नाशिक- पुणे महामार्गावर एसटी बसने ब्रेक फेल झाल्यामुळे तीन ते चार दुचाकीस्वारांना चिरडत पुढे उभ्या असलेल्या दुसऱ्या बसला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला असून तब्बल 8 ते 10 प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर नाशिकच्या जिल्हा रुग्णालय तथा काही रुग्णांवर खासगी दवाखान्यात उपचार सुरु आहेत. नेमका हा अपघात कसा झाला. बसमधील प्रवासी यातून कसे बचावले याचा घेतलेला आढावा. ...अन् आम्ही सिट वरून उडून खाली पडलो.

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील रुपाली या आपल्या भाचीच्या लग्नासाठी नाशिक येथे निघाल्या होत्या. ज्या बसचा अपघात झाला त्या बसमध्ये त्याही होत्या. रुपाली सांगतात, आम्ही नाशिकला येण्यासाठी सिन्नर येथून बस पकडली. शिंदे- पळसे येथे टोल नाका बसने ओलांडला मात्र पुढे बस थांबायला तयार नव्हती अन् अचानक बसच्या चालकाने गाडीतून उडी मारली. बस समोर चालत असलेल्या दुचाकींना चिरडत वेगात पुढे जात असताना समोर उभ्या दुसऱ्या बसला जाऊन धडकली. ही धडक इतकी भीषण होती की आम्ही सिट वरून उडून खाली पडलो. यात माझ्या लहान मुलीला गंभीर इजा झाली. बसच्या इंजिनमधून धुर येऊ लागताच बाहेर उभ्या नागरिकांनी आम्हाला बसमधून बाहेर येण्यासाठी मोठ मोठ्याने आरोळ्या दिल्या. मात्र बसच्या पुढील दाराच्या बाजुने धडक लागल्यामुळे मुख्य दरवाजा लॉक झाला होता. अन् तेथून बसने पेट घेतला. दैव बलवत्तर म्हणून अथक प्रयत्नांनी दरवाजा उघडला अन् आम्ही बसमधून बाहेर आलो. आम्ही बसमधून उतरून अगदी 10 पावलं चालतो तोच संपुर्ण बसने पेट घेतला. या बसमध्ये माझं सोनं अन् रोख रक्कम जळून खाक झाली. असा भयावह अनुभव रुपाली यांनी 'सकाळ'शी बोलताना सांगितला.

# गुजरात निकाल : सगळी देशाची सत्ता त्यासाठी वापरण्यात आली

## शरद पवार : महाराष्ट्र - कर्नाटक वादात केंद्राला बघ्याची भूमिका घेता येणार नाही

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गुजरातची निवडणूक एकतर्फी होईल यामध्ये कोणाच्या मनात शंका नव्हती. सगळी देशाची सत्ता त्यासाठी वापरण्यात आली. अनेक निर्णय एका राज्याला सोयीचे घेण्यात आले. अनेक प्रकल्प त्या राज्यात कसे येतील याची काळजी घेतली गेली. त्याचा परिणाम गुजरातमध्ये एकतर्फी निकाल लागणार याबद्दल कोणाच्या मनात शंका नव्हती.
गुजरात निकाल लागला म्हणजे देशात लोकांचा एका बाजूने मतप्रवाह जातो हे म्हणणे उचित नाही. याचे उत्तम उदाहरण दिल्ली महानगर पालिकेमध्ये तिथल्या जनतेने दाखवले अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय शरद पवार यांनी पक्षाच्या प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीत व्यक्त केली. गेली १५ वर्षे दिल्ली महानगरपालिकेत भाजपाची सत्ता होती ती आता राहिलेली नाही. काल हिमाचलप्रदेशाची निवडणूक झाली. तिथे भाजपाचे राज्य होते. आताच्या माहितीनुसार भाजपाला तिथे २७ जागा मिळाल्या आणि ३७ जागा काँग्रेसल्या मिळाल्या. आज या ठिकाणी भाजपाचे राज्य गेले. दिल्लीमधील राज्य गेले. याचा अर्थ हळूहळू बदल व्हायला लागला आहे. राजकारणात पोकळी असते. गुजरातची पोकळी भाजपाने भरून काढली आणि दिल्लीची पोकळी केजरीवाल यांच्या आपने भरून काढली. आज अनेकांना बदल हवे आहेत त्याची नोंद राजकीय जाणकार कार्यकर्त्यांनी घेऊन ती पोकळी भरून काढण्यासाठी आवश्यक ते कार्यक्रम घेतले पाहिजे. आज महाराष्ट्रात ती पोकळी आहे, त्या पोकळीला सामोरे जाऊन जनतेला पर्याय द्यायची ताकद कोणा पक्षात असेल तर तो राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आहे असेही शरद पवार म्हणाले. दरम्यान आपण कमीत कमी भाजपच्या प्रवृत्तीविरुद्ध असलेल्या शक्ती आहेत त्या एकत्रित कशा करता येतील व त्या एकत्रित करताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना या सर्व कामात प्रोत्साहित करता येईल, निर्णय घेण्याच्या




प्रक्रियेत पक्षाचे जिल्हा, तालुका, राज्याचे सर्व सहकारी कसे महत्वाची कामगिरी करतील हे बघण्याची आवश्यकता आहे असे आवाहनही शरद पवार यांनी केले.
काल विरोधकांच्या झालेल्या बैठकीचा पुढाकार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घेतला. इतर पक्षांनी ते धोरण मान्य केले. असेच कार्यक्रम इथून पुढे घेण्याचा काम पक्षाच्या नेतृत्वाकडून होतेय याचा अर्थ हा घ्यावा लागेल की जी पोकळी आहे ती भरून काढण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रयत्न करतो आहे. यासाठी प्रत्येकाला आपआपल्या भागात अधिक लक्ष देण्याची गरज आहे. नगरपालिका, महानगरपालिका जिल्हा परिषद अशा निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. जरी या निवडणुका लांबणीवर पडल्या तरी आपण आपले काम चालूच ठेवले पाहिजे. शक्यतो या निवडणुकीत नवी पिढी किती अधिक आणता येईल. त्यांना प्रोत्साहित कसे करता येईल याबद्दलचा दृष्टीकोन वरिष्ठ नेत्यांनी ठेवला पाहिजे. ही निवड करताना त्या - त्या भागातील होतकरू तरूण कार्यकर्त्याला नाऊमेद करता कामा नये. यातून अपेक्षा अशी आहे की, भविष्यात या निवडणुका झाल्यानंतर महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची एक दुसरी फळी तयारी झाली आहे तिच्या हाती सूत्र दिली ते काम करण्याची आज याठिकाणी आवश्यकता आहे असेही शरद पवार म्हणाले. सीमाप्रश्न हा फार जुना प्रश्न आहेत. यात महाराष्ट्राची जी मागणी आहे तिला जनतेचा आधार आहे. आपण अनेक निवडणुकीमध्ये हा निर्णय लोकांचा आहे हे देशासमोर सिद्ध करू शकलो. अनेकदा याठिकाणी मराठी भाषिकांच्या बाजूने निकाल लागल्यानंतर तरीही काही होत नाही हे पाहिल्यानंतर लोक नाउमेद होतात. अशी परिस्थिती सध्या सीमाभागात झाली आहे. ज्यांच्या हाती सत्ता आहे त्यांनी बेळगाव किंवा अन्य भागातील प्रश्न संपुष्टात कसा निघेल, इथले मराठी बाहुल्य कमी कसे होईल यासाठी योजनाबद्ध प्रयत्न केले. अनेक सरकारी कार्यालय या ठिकाणी आणली, कानडी लोकसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला. मराठी आणि कानडी याच्यात वाद नाही. कानडीचा द्वेष आम्ही कधी करणार नाही. कानडीसुद्धा एका राज्याची भाषा आहे. आपल्या त्या राज्याशी संघर्ष नाही आपला संघर्ष फक्त तिथे असलेल्या मराठी भाषिकांना न्याय मिळावा, त्यांना न्याय मिळण्याचा त्यांचा अधिकार आहे जो लोकशाहीच्या माध्यमातून अनेकदा सिद्ध झाला. तेवढ्यापूरता हा प्रश्न आहे पण दुर्दैवाने तिथल्या सरकारने वेगळी भूमिका घेतली.

# अन्यथा महाराष्ट्र बंद होईल : संभाजीराजे

## राज्यपालांना महाराष्ट्राबाहेर पाठवा



आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी :** राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी एका वेळा नाही, तर दोन वेळा छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला आहे. बारा बलुतेदार आणि बहुजन समाजाला पुढे घेऊन जाणारा हा महाराष्ट्र आहे. सरकारकडून राज्यपालांना हटवले जाणार असे म्हटले जात होते. मात्र, अद्यापही त्यावर कोणातही निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे आता अँक्शन घेण्याची वेळ आली आहे. राज्यपालांना राज्याच्या बाहेर पाठवा नाहीतर महाराष्ट्र बंद होइल, असा इशारा संभाजीराजे छत्रपती यांनी दिला आहे.
राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल केलेल्या बेताल वक्तव्याचा निषेध करत राज्यपालांना राज्याच्या बाहेर हटवावे यासाठी आज पिंपरी-चिंचवड शहर बंदचे आवाहन करण्यात आले होते. त्याला पाठिंबा देण्यासाठी संभाजीराजे छत्रपती पिंपरी येथे आले होते. त्यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी संभाजीराजे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्या राज्यपाल भगतसिंह कोश्यारींबाबत आपण फक्त चर्चा करत बसलो आहोत. त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र येण्याची गरज असून आपला आवाज दिल्लीपर्यंत पोहचवण्याची गरज आहे. राज्यपालांची अशी बोलण्याची हिम्मत होतेच कशी, एवढे असूनही सत्ताधारी त्यांना सपोर्ट करतात, हीच मोठी शोकांतिका आहे. काही जण बोलतात आम्ही निरोप पोहचवला. पण हे सांगा की काय निरोप पोहचवला?. कोश्यारी यांची हकालपट्टी करा असा निरोप पोहचवला का? असे जाहीरपणे सांगा, असा टोलाही देवेंद्र फडणवीस यांना लगावला आहे. पिंपरी चिंचवड शहर ही उद्योगांची नगरी असून बंदची सुरुवात याच शहरातून झाली आहे. त्यामुळे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना लवकरात लवकर राज्याबाहेर पाठवा अशी मागणी संभाजीराजे यांनी केली आहे.

# शिंदे - फडणवीस सरकारबद्दल जनतेच्या मनात प्रचंड चीड : जयंत पाटील

## कर्नाटक सरकार हल्ले करतेय आणि राज्यसरकार कर्नाटकच्या बँकेला व्यवसाय देत आहे हे दुर्दैवी



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सीमा भागातील लोकांचे प्रश्न सोडवण्यात हे सरकार अपयशी ठरले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास चुकीच्या पद्धतीने मांडला जात आहे. महाराष्ट्रातील प्रकल्प गुजरातला जात आहे,याबाबत जनतेमध्ये असंतोष आहे. त्यामुळेच महाविकास आघाडी सरकारच्यावतीने १७ डिसेंबरला मोर्चा काढण्यात येणार आहे यासर्वांवर विचार राष्ट्रवादीच्या बैठकीत केला जाणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली.
गेल्या काही दिवसापासून महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमाभागात वाद सुरू आहेत, तिथले मुख्यमंत्री आपल्या राज्याबद्दल अनुउद्गार काढतात, इतकेच नाही तर महाराष्ट्राच्या वाहनांची तोडफोड केली जात आहेत अशामध्ये राज्यसरकारमार्फत कर्नाटकच्या बँकेला व्यवसाय दिले जात आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री स्वाभिमान गहाण ठेवून काम करत असेल तर हे दुर्दैवी आहे. सरकारच्या विद्वत्तेचे कौतुक करावे तितके कमी आहे अशा शब्दात जयंत पाटील शिंदे - फडणवीस सरकारवर यांनी हल्लाबोल केला. काँग्रेस आणि आप यांच्या मतांमध्ये विभागणी झाली त्याचा फायदा भाजपला गुजरातमध्ये मिळाला आहे असेही पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलताना जयंत पाटील म्हणाले.



# पराक्रमी रोहित शर्मा

आधुनिक केसरी

ढाकाच्या शेरे बांगला नॅशनल स्टेडियमवर भारत आणि बांगलादेश यांच्यातील दुसरा एकदिवसीय सामना अतिशय रोमहर्षक ठरला. या सामन्यात अनेक टर्निंग पॉईंट पाहायला मिळाले. दरम्यान, प्रथम फलंदाजी करत बांगलादेशच्या संघाने भारतासमोर 272 धावांचे लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात भारतीय संघाला निर्धारित 50 षटकात 266 धावापर्यंत मजल मारता आली. या सामन्यातील अखेरच्या काही षटकात दुखापतग्रस्त रोहित शर्माने सामन्याचे रुप बदलण्याचा प्रयत्न केला. परंतु, तो अपयशी ठरला. हा सामना भारताने पाच धावांनी गमावला. या सामन्यात रोहित शर्माने नाबाद 51 धावांची खेळी केली. ज्यात तीन चौकार आणि पाच षटकारांचा समावेश होता. या कामगिरीसह रोहित शर्माने आंतराष्ट्रीय क्रिकेटमधील 500 षटकारांचा टप्पा ओलांडला. अशी कामगिरी करणारा रोहित शर्मा पहिला भारतीय आणि जगभरातील दुसरा खेळाडू ठरलाय. वेस्ट इंडीजचा तडाखेबाज फलंदाज ख्रिस गेलच्या नावावर 500 हून अधिक षटकारांची नोंद आहे. आंतराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणाऱ्या फलंदाजाच्या यादीत ख्रिस गेल अव्वल स्थानी आहे. त्याच्या नावावर 553 षटकारांची नोंद आहे. 502 षटकारांसह रोहित शर्मा दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यानंतर या यादीत पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू शाहीद आफ्रिदी तिसऱ्या क्रमांकावर आहे. शाहीद आफ्रिदीने त्याच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या कारकिर्दीत 476 षटकार लगावले आहे. न्यूझीलंडचा ब्रेंडन मॅक्युलम 398 षटकारांसह चौथ्या क्रमांकावर आहे. तर, मार्टिन गप्टील (383 षटकार) पाचव्या क्रमांकावर आहे. रोहित शर्मानं एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक 256 षटकार लगावले आहेत. तर, कसोटीत 64 आणि टी-20 क्रिकेटमध्ये 182 षटकार मारले आहेत. एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणाऱ्या फलंदाजांमध्ये शाहीद आफ्रिदी (351 षटकार) टॉपवर आहे. त्यानंतर ख्रिस गेल 331 षटकारासंह दुसऱ्या आणि सनथ जयसूर्या 270 षटकारांसह चौथ्या क्रमांकावर आहेत. तर, आंतरराष्ट्रीय टी-20 क्रिकेटमध्ये रोहित शर्माच्या नावावर सर्वाधिक षटकारांची नोंद आहे. महेंदी हसन शतकी आणि महमूदुल्लाहच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर निर्धारित 50 षटकात सात विकेट्स गमावून बांगलादेशने भारतासमोर 272 धावांचं लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात भारतीय संघ निर्धारित 50 षटकांत 266 धावापर्यंतच मजल मारू शकला. भारताने हा सामना पाच धावांनी गमावला. या मालिकेतील पहिला सामना गमावल्यानंतर भारताला कोणत्याही परिस्थितीत हा सामना जिंकणं गरजेचं होतं. परंतु, बांगलादेशच्या भेदक माऱ्यासमोर भारतीय फलंदाजांनी गुडघे टेकले. अखेरच्या काही षटकात फलंदाजी करण्यासाठी मैदानात आलेल्या दुखापतग्रस्त रोहित शर्माने सामना फिरवण्याचा प्रयत्न केला. परंतु, भारताला विजय मिळवून देण्यात तो अपयशी ठरला.

# ना खाऊंगा- ना खाने दूँगा



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भ्रष्टाचार मुक्त भारत बनवायचा आहे ते त्यांचे स्वप्न आहे. त्यामुळे त्यांनी त्यांची भूमिका याआधी जाहीर केली आहे "ना खाऊंगा ना खाने दूंगा". अर्थात भ्रष्टाचार करणार नाही आणि करुही देणार नाही. परंतु ना खाने दूंगा म्हणजे भ्रष्टाचार करू देणार नाही हा भाग मात्र जवळपास जैसे थे आहे. आज आपण जर वर्तमानपत्र उघडले तर जशा शेतकऱ्यांच्या आत्महत्या च्या बातम्या वाचायला मिळतात तसेच पानोपानी भ्रष्टाचाराच्या बातम्या वाचायला मिळतात. अर्थातच हा भ्रष्टाचार अनेक प्रकारांचा असतो तो अगदी खाली तलाठ्यापासून तर उच्च प्रशासकीय अधिकाऱ्यापर्यंत असतो, आमदार, खासदार, राजकीय पदाधिकारी, आता त्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद हे सर्व कार्यालय येतात. कितीही म्हटले तरी तो यामधील भ्रष्टाचार अद्याप पर्यंत थोपवता आलेला नाही. त्याचीही अनेक करणे आहेत.**

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मनात जरी भ्रष्टाचार मुक्त भारत ही संकल्पना असली तरीपण आज आपण बघत आहोत, तसे वातावरण नाही. ज्या त्या क्षेत्रात भ्रष्टाचार माजलेला आहे. अगदी गाव पातळीपासून भ्रष्टाचाराची मूळ आहेत आणि वरती तर मग त्याचा वृक्ष झालेला आहे .आज मितीला जर बघितले तर सहकार खाते, सार्वजनिक बांधकाम,परिवहन, अन्न पुरवठा, महसूल,कृषी, गृह, उर्जा, वन, ग्राम विकास, आदिवासी विकास, ग्राहक विभाग , शिक्षण विभाग,सर्व खाते भ्रष्टाचाराचे कुरणे आहेत. पंतप्रधानांनी कठोर पावले उचलण्याचा निर्धार केलेला आहे.

अनेक विकासाच्या योजना राबविण्यात येतात. त्यात मोठे प्रमाणावर भ्रष्टाचार होतो. तो थोपवण्याचे आव्हान आहे. सातबारा उतारावरील पक्की नोंद करण्यासाठी पैशाची मागणी केली जाते, शेतात वीज कनेक्शन घेताना पैशाची मागणी केली जाते, जिल्हा परिषद मधून शिक्षण विभागातून पगार काढण्यासाठी पैशाची मागणी केली जाते, वनविभागात वृक्ष लागवडीमध्ये भ्रष्टाचार होतो, सरकारी धान्य गोडाऊन मधून माल बाहेर विकला जातो. शेतकऱ्याला शेडनेट मंजुरीसाठी पैसे द्यावे लागतात, तसेच बऱ्याच वेळा निरनिराळे कर्ज मंजुरीसाठी पैसे द्यावे लागतात. मंत्रालयापासून जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालयापर्यंत कुठेही सर्वसामान्य माणसाचे काम सहजरीत्या होत नाहीत. ही साखळी अनेक वर्षांपासून तशीच आहे. लाखाच्यावर पगार असणाऱ्या शासकीय सेवेतील कर्मचारी लाच घेताना कचरत नाही आणि त्यांनाही काही वाटत नाही. लाखाच्या वर पगार घेणारा कर्मचारी शेतकऱ्याकडून सुद्धा पैशाची मागणी करतो,आणि घेतो, ही अतिशय शरमेची गोष्ट आहे. या सगळ्या गोष्टींना कुठेतरी लगाम घालणे आवश्यक आहे. भूमी अभिलेख कार्यालयात अनेक दलालांचा वावर असतो. नाव लावण्यासाठी या ठिकाणी दर ठरलेले आहेत आणि यातील वाटा साहेबांना द्यावा लागतो असे सांगून दलाला कडून सर्वसामान्यांची लूट करण्यात येते. अलीकडेच पुण्यास ट्रस्टच्या जागेचे एन.ए. प्रस्ताव मंजूर करण्यासाठी 42 लाख लाच मागीतली.तहसीलदार महसूल सहाय्यक, तलाठी आणि खाजगी व्यक्ती अशा पाच जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. मनरेगा अंतर्गत गोठा, सिंचन, विहिरी तसेच इतर योजनांच्या फाइल्स 25% रक्कम घेतल्याशिवाय पुढे सरकत नाहीत. यामध्ये कर्मचारी अधिकारी नेत्यापर्यंतची साखळी असल्याचा स्फोट ग्राम विकास मंत्री गिरीश महाजन यांनी जळगावच्या बैठकीत केला . जर असेच सुरू



राहिले तर पंतप्रधानांचे भ्रष्टाचार मुक्त भारताचे स्वप्न कसे पूर्ण होईल ? असेही म्हटले होते. बोगस बी बियाण्यामुळे शेतकऱ्यांना खूप मोठा फटका बसतो परंतु कंपन्यांवर कडक कारवाई होत नसल्यामुळे आणि त्यातही भ्रष्टाचार असल्यामुळे ते शक्य होत नाही .जालना जिल्ह्यातील परतुर येथील उपविभागीय कृषी अधिकारी यांना एक लाख रुपयाची लाच घेताना रंग हात पकडले. कृषी संजीवनी योजनेतून घेतलेल्या शेडनेटचे बिल काढण्यासाठी पैशाची मागणी केली होती.तर भूसंपादन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठवण्यासाठी लाच स्वीकारतांना उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात आली. असे एक ना अनेक भ्रष्टाचारी प्रकरणे आपल्याला पाहायला मिळतात. लाच लुचपत विभागामार्फत सापळे रचले जातात भ्रष्टाचारींना पकडण्यात येते परंतु त्याचे पुढे काय होते ? हे मात्र समजत नसते. ते प्रश्न अनुत्तरीतच राहतात. त्या दृष्टीने अशा केलेल्या कार्यवाहीचा आणि कारवाईचा अहवाल वेळोवेळी प्रसिद्ध व्हायला हवा जेणेकरून जनतेमध्ये जागृती निर्माण होईल. भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व सामान्य नागरिकांना सामील करून घेण्याच्या गरजेवर पंतप्रधानांनी भर दिला आहे. त्यामुळे भ्रष्टाचारी किती शक्तिशाली असला तरी त्यांना वाचवायचे नाही ही जबाबदारी अनेक संस्थांची आहे तसेच त्या व्यक्तीला राष्ट्रीय सामाजिक पाठबळ मिळायला नको अशा वातावरण निर्मितीची गरज आहे. एका कार्यक्रमात नाना पाटेकर यांनी मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारला मंत्री तर जाऊ द्या,पण साधा आपला नगरसेवक यावर्षी निवडून आला की पुढच्या वर्षी मालामाल होतो.कोट्याधीश होतो. मला कळतं सगळ्यांनाच कळत,तुम्हालाही कळत, आपण पण बोलत नाही. त्याची चौकशी व्हायला नको का ? एकनाथराव ?परंतु त्याचे उत्तर मुख्यमंत्री न देता,देवेंद्र फडणवीस यांनी दिले. आपण म्हणतात ते बरोबर आहे. पण परिस्थितीच अशी आहे की आज भ्रष्टाचाराच्या आरोपातून बाहेर आलेल्या,अनेक चौकशात,घोटाळ्यात अडकलेल्या लोकांची पसंती असते. तो मोठ्या मताने निवडून येतो आमचा नाईलाज असतो.

जनतेने खरं खोटं चांगलं वाईट हे ओळखायला पाहिजे त्याची गरज आहे. परंतु हे उत्तर नाना पाटेकर यांनी ऐकून घेतले त्यावर नंतर चर्चा केली नाही. परंतु फडणीसांची हे उत्तर फारसे संयुक्तिक वाटत नाही. आपण स्वतः इतके स्वच्छ असताना मग अशा भ्रष्ट लोकांना सामावून घेतात मग भ्रष्टाचार मुक्त भारत हे स्वप्न पंतप्रधान उराशी बाळगून आहेत ते कसे पूर्ण होणार. सरकार कोणाची असो पक्ष कोणताही असो पण अशा लोकांना राजकारणापासून त्यांची जागा त्यांना दाखवली पाहिजे, त्यांना निवडणुकीत तिकीट द्यायला नको तरच हे शक्य आहे . अधिकाऱ्यांच्या बाबतीत कडक धोरण ठेवायला हवे, नाहीतर अशा लोकांना उदो उदो सुरू राहिला तर ही भ्रष्टाची कीड अशीच वाढत जाणार आहे आणि म्हणून जो प्रश्न नाना पाटेकर यांनी एकनाथ शिंदे यांना विचारला तोच प्रश्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही आहे असे समजण्यास काही हरकत नाही. नगरसेवक असो पंचायत समिती सदस्य अध्यक्ष जिल्हा परिषद अध्यक्ष सदस्य जिल्हा बँक अध्यक्ष संचालक, दूध संघ मार्केट कमिटी महामंडळ अध्यक्ष सदस्य मंत्री आमदार खासदार त्यांचे अगदी जवळचे कार्यकर्ते सहाय्यक ही मंडळी थोड्या दिवसातच मालामाल होत असते हे काही लपून राहत नाही. परंतु हा प्रश्न जे स्वतःला सेवक म्हणतात त्यांना कोण विचारणार ? ही परिस्थिती न बदलण्यास जनताही आहे तेवढीच कारणीभूत आहे . आपले काम पैसे देऊन करून घ्यायचे आणि भ्रष्टाचारावर गप्पा करायच्या.

यापुढे ज्याच्यावर गुन्हे दाखल आहेत, तुरुंगवास भोगून आले आहे, असे आमदार खासदार मंत्री यांचे पेन्शन आणि इतर सवलती तसेच प्रशासकीय अधिकारी कर्मचारी अशा प्रकरणात असतील, भ्रष्टाचारात असतील त्यांचे सुध्दा पेन्शन ग्रॅच्युइटी गोठवायला हवे. तरच अशा कडक कारवाईमुळे "ना खाऊंगा ना खाने दूंगा" याला काही अर्थ प्राप्त होईल.

# मीराबाई चानूची चमकदार कामगिरी



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**भारताची स्टार वेटलिफ्टर मीराबाई चानूने वेटलिफ्टिंग वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये इतिहास रचला. मीराबाईने ४९ किलो गटात २०० किलो वजन उचलून रौप्य पदक जिंकले आहे. कोलंबियातील बोगोटा येथे बुधवारी ही स्पर्धा पार पडली. विशेष म्हणजे तिची प्रतिस्पर्धी खेळाडू झिहुई ही ४९ किलो वजनी गटातील ऑलिम्पिक चॅम्पियन आहे. तिने टोकियो ऑलिम्पिकमध्ये ४९ किलो गटात सुवर्णपदक जिंकले होते. मीराबाईने या स्पर्धेत झिहूईचा पराभव केला आणि रौप्य पदक पटकावले. झिहुईला कांस्यपदकावरच समाधान मानावे लागले. विशेष म्हणजे, मीराबाई चानूला या वर्षी सप्टेंबरमध्ये ट्रेनिंदरम्यान दुखापत झाली होती.**

ती मनगटाच्या दुखापतीशी झुंज देत आहे. तिने क्लीन अँड जर्कमध्ये ११३ किलो वजन उचलले. मात्र, स्नॅच प्रकारात वजन उचलत असताना तिचा तोल गेला पण अशा परिस्थितीतही तिने स्वतःचा शानदार बचाव केला. मीराबाईने स्नॅचमध्ये ८७ किलो वजन उचलले. अशा प्रकारे तिने एकूण २०० किलो वजन उचलून इतिहास रचला. यापूर्वी ऑक्टोंबरमध्ये झालेल्या नॅशनल गेम्समध्येही ती दुखापतीसह सहभागी झाली होती. मीराबाईचा जन्म इंफाळपासून २२ किमी दूर असणाऱ्या नोंगपोक काकचिंग गावात गरीब कुटुंबात झाला होता. तिच्या कुटुंबात सहा भावंड होती. लहानपणापासूनच तिला तिरंदाजी मध्ये करिअर करायचं होतं, पण आठव्या इयत्तेत असताना तिने वेटलिफ्टिंगमध्ये करिअर करण्याचा निर्णय घेतला. इम्फाळची वेटलिफ्टर कुंजराणीला पाहून आपणही वेटलिफ्टर व्हावं, अशी ईच्छा मीराबाईला झाली. मीराबाईच्या जिद्दीपुढे आई-वडिलांनाही माघार घ्यावी लागली. २००६ मध्ये तिने सराव सुरू केला तेंव्हा लोखंडाचा बार नसल्यानं ती बांबूच्या बारनं सराव करत असे. जेवणात चिकन आणि अंडी लागायची. पण सामान्य कुटुंबात जन्मलेल्या मीराबाईला तेही शक्य नव्हतं. पण यामुळे मीराबाई थांबली नाही. मीराबाईलावेटलिफ्टिंगचं प्रशिक्षण घेण्यासाठी दररोज पहाटे उठून २२ किलोमीटरचा प्रवास करुन प्रशिक्षण केंद्रात जावं लागायचं. तिथून




आल्यानंतर पुन्हा शाळेची तयारी आणि शाळेतून घरी आल्यावर अभ्यास यातच संपूर्ण दिवस निघून जायचा. वयाच्या ११ व्या वर्षी मीराबाई अंडर १५ चॅम्पियन होती आणि १७ व्या वर्षी ज्युनियर चॅम्पियन. ज्या कुंजराणी यांना बघत मीराबाईच्या मनात चॅम्पियन बनण्याचं स्वप्न जागृत झालं त्याच कुंजराणी यांचा १२ वर्षं जुना विक्रम मीराबाईने मोडीत काढला, १९२ किलो वजन उचलून. असं असलं तरी प्रवास सोपा नव्हता. कारण मीराबाईच्या आई-वडिलांजवळ पुरेशी साधनसंपत्ती नव्हती. रिओ ऑलिम्पिकसाठी पात्र न झाल्यास खेळ सोडावा लागेल, अशी परिस्थिती उद्भवली होती. पण ही वेळ आली नाही. २०१४ च्या ग्लास्गो राष्ट्रकुल स्पर्धेत मीराबाईने भारतासाठी रौप्यपदक जिंकले होते. या प्रकारातील सुवर्णपदकही भारताच्या खात्यात आले होते. २०१६ च्या रिओ ऑलिम्पिकमध्ये पात्रता फेरीत मीराबाईने तिची आयडॉल असलेल्या कुंजराणीचा पराभव केला आणि ऑलिम्पिकमध्ये आपले स्थान पक्के केले होते. मात्र रियो ऑलिम्पिक २०१६ मध्ये तिने विशेष कामगिरी केली नव्हती. रिओ ऑलिम्पिकमध्ये मीराबाईच्या पदरात निराशा आली होती. ऑलिम्पिकसारख्या खेळात प्रतिस्पर्ध्याकडून हार पत्करावी लागली तर वेगळी गोष्ट आहे. पण खेळाडू त्याचा खेळ पूर्णच करू शकला नाही तर ती गोष्ट खेळाडूच्या मानसिक धैर्याला धक्का पोहोचवणारी असते. २०१६ मध्ये मीराबाईबरोबरही असंच झालं होतं. ऑलिम्पिकमध्ये मीराबाई अशी दुसरी खेळाडू होती जिच्या नावासमोर डिड नॉट फिनिश असं लिहिलेलं होतं. जे वजन मीराबाई सराव करताना सहजपणे उचलत असे, तेच वजन ऑलिम्पिक स्पर्धेत उचलताना जणू तिचे हात जखडले होते. त्यावेळी भारतात रात्र असल्यामुळे हे खूप कमी भारतीयांनी बघितलं. सकाळी उठल्यानंतर भारतातल्या क्रीडाप्रेमींनी जेव्हा ही बातमी वाचली तेव्हा मीराबाई त्यांच्या नजरेत व्हिलन ठरली. त्यावेळी मीराबाई चानूला मोठ्या प्रमाणात टीका सहन करावी लागली होती. याकाळात ती नैराश्याचा सामना करत होती. दर आठवड्याला तिला मानसिक तज्ज्ञांकडून उपचार घ्यावे लागले. वेटलिफ्टिंमधून निवृत्त होण्याचाही विचार तिच्या मनात आला होता. मात्र त्यानंतर तिने मागे वळून पाहिलं नाही. नैराश्यावरही मात करुन मीराबाईनं दमदार पुनरागमन केलं. यापूर्वी मीराबाई चानूने२०१७ मध्ये झालेल्या वेटलिफ्टिंग वर्ल्ड चँपियनशिप मध्ये १९४ किलो (८५ आणि १०९ किलो) वजन उचलून सुवर्ण जिंकले होते .नुकत्याच संपन्न झालेल्या टोकियो ऑलिम्पिक मध्ये मीराबाई चानूने ४९ किलो वजनी गटात वेटलिफ्टिंगमध्ये रौप्य पदकाची कमाई केली होती. मीराबाईने स्नॅच आणि क्लीन अँड जर्कमध्ये एकूण २०२ किलो वजन उचलून आपले ऑलिम्पिक पदक पक्के केले होते. मीराबाईचे हे वर्ल्ड चॅम्पियनशिपमधील दुसरे पदक आहे. मिराबाई चानूच्या या यशाबद्दल अभिनंदन!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# देशविघातक सीमाविवाद



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

कर्नाटक काय किंवा महाराष्ट्र काय दोन्हीही हिंदुस्थानच आहे त्यामुळे हिंदुस्तान पाकिस्तान प्रमाणे होईल असे दोन्ही राज्यांनी आपसात वैर दाखविणे हे बरोबर नाही. कर्नाटकात येणाऱ्या काळामध्ये निवडणुका आहेत. त्यामुळे त्यांना निवडणुकीसाठी जनभावना आंदोलित होतील अशा पद्धतीचा मुद्दा पाहिजे आहे. त्यासाठी त्यांनी पुन्हा एकदा महाराष्ट्र कर्नाटक सीमा विवाद हा मुद्दा बाहेर काढलेला आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री बोंमई हे सातत्याने खोचक आणि बेताल वक्तव्य करीत आहेत. त्यांच्या अशा वक्तव्यांमुळेच कन्नड रक्षण वेदिका सारख्या संघटनेला बळ मिळते आणि त्याचेच परिणाम म्हणजे महाराष्ट्राच्या बसेस अडविणे, त्यांच्या काचा फोडणे, त्याला काळे फसणे हे सर्व कर्नाटकच्या सीमेमध्ये सुरू आहे. लातूरच्या सीमेवर एक बस रोखण्यात आली व त्यातून प्रवाशांना खाली उतरवून देण्यात आले.

याचा प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. भारत-बांगलादेश यांच्या दरम्यान जर बस सेवा चालू शकते तर महाराष्ट्र कर्नाटक याच्यादरम्यान काय चालू नये? महाराष्ट्रात सुद्धा मनसेने कर्नाटकच्या बसेस अडवून त्यांच्यावर शाही फेकून आपला निषेध नोंदविलेला आहे. महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील काही दुष्काळग्रस्त गावांनी पाण्याची मागणी केली असता कर्नाटकने त्यांच्यासाठी पाणी सोडले व महाराष्ट्र तुमचे ऐकत नसेल पण आम्ही ऐकत आहोत त्यामुळे आम्ही तुमच्या जवळचे आहोत तुम्ही कर्नाटकात सामील व्हा अशा पद्धतीचा खोडकरपणा कर्नाटकने केलेला आहे. यावरून या सीमा विवादाला राजकीय संरक्षण प्राप्त आहे हे आपल्या लक्षात येईल. परंतु ज्या वेळेस सर्वसामान्य माणूस या प्रश्नाकडे बघतो तर त्याला या सीमा विवादाबद्दल फारसे काही माहीत नसते. 1956 साली ज्यावेळेलाभाषा वार प्रांत रचनेनुसार कर्नाटकची निर्मिती झाली त्यावेळेस महाराष्ट्रातील एक मोठा प्रदेश ज्यामध्ये बेळगाव होते या बेळगाव मध्ये 75 टक्के पेक्षा अधिक लोक मराठी भाषिक होते व हे बेळगाव महाराष्ट्रात रहावे अशी तेथील जनतेची इच्छा होती. बेळगाव समवेतच कारवार व निपाणी या तालुक्यातील जनतेची सुद्धा महाराष्ट्रात राहण्याची इच्छा होती परंतु घिसाडघाईने व दूरगामी परिणामांचा विचार न करता त्यावेळेसच्या केंद्र सरकारने या सर्व तालुक्यांना जनमताच्या विरोधात कर्नाटकात विलीन करविले. व तेव्हापासून हा सीमा विवाद सुरू आहे. आजही आपण बघतो की महाराष्ट्रात राहणारे उत्तर प्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, आंध्र इत्यादी राज्यातील लोक त्यांच्या घरी त्यांची मातृभाषा बोलतात व शिक्षण सुद्धा शक्यतोवर त्यांची भाषा शिकविणाऱ्या शाळेतच घेतात. यावरून लक्षात येते की मनुष्य आपली मातृभाषा सोडू शकत नाही. त्याला आपल्या मातृभाषेत बोलायला व व्यवहार करायला जेवढे सोपे जाते तेवढे अन्य भाषेत जात नाही. छंद म्हणून एखादी भाषा शिकणे वेगळे परंतु स्वाभाविकरीत्या मातृभाषा च बोलली जाते. आम्ही जर विदेशात गेलो व आम्हाला एखादा कर्नाटकचा माणूस भेटला तर आम्हाला आनंद होईल परंतु तेथे मराठी




माणूस भेटला तर मात्र  अत्यानंद होईल. हेच इतर भाषीय लोकांसाठी सुद्धा लागू आहे. कारण भाषेमुळे त्यांच्यामध्ये जवळीकता निर्माण होते. मराठी भाषिक लोकांना कर्नाटक मध्ये सामील करायचे होते तर कर्नाटक व महाराष्ट्र असे प्रांत निर्माण करण्याची काय आवश्यकता होती? ज्यावेळेस नेहरू सरकारने भाषावार प्रांतरचनेचा निर्णय घेतला त्यावेळेला त्यांनी समान भाषिकांचे एक राज्य असावे अशी भूमिका घेतली. वास्तविकता प्रशासनाच्या सोयीसाठी भौगोलिक एक्य असणाऱ्या लोकांचे राज्य असावे हे जास्त गरजेचे होते. परंतु भाषावार प्रांतरचनेमुळे भाषिक अभिनिवेश निर्माण होईल. त्यातून कट्टरता निर्माण होईल हा विचार त्यावेळच्या नेहरू सरकारने केला नाही. गुजरातच्या निर्मितीच्या वेळेस सुद्धा अशा पद्धतीचे वाद निर्माण झाले होते. परंतु कालांतराने ते शमले. अरे ला कारे म्हणण्याची आपल्या समाजाची मानसिकता आहे. त्यामुळे कोणी कर्नाटकचे म्हणजे कन्नडचे तुणतूणे वाजवले तर त्याला प्रत्युत्तर म्हणून मराठीचेही तुणतुणे वाजविणे सुरू होते हा आपला अनुभव आहे. केंद्रात व महाराष्ट्रात सुद्धा अनेक वेळा काँग्रेसचे सरकार राहिलेले आहे. परंतु त्यांनी या सीमा विवादावर काहीही केलेले नाही. जी शिवसेना मराठीचे मुद्दे घेऊन निवडून येते तिने सुद्धा स्वतः सत्तेवर आल्यावर हा प्रश्न सोडविला नाही. यावरून सीमा विवाद हा राजकीय पोळी भाजण्यासाठी आहे का? असा प्रश्न निर्माण होतो. परंतु ज्या वेळेस अशा पद्धतीचा विवाद निर्माण केल्या जातो त्यावेळेस आपण एक गोष्ट लक्षात ठेवायला पाहिजे की राष्ट्रीय एकात्मतेला त्यामुळे धक्का बसतो.देशाच्या सीमेचे रक्षण करणारा जवान कन्नड किंवा महाराष्ट्रीय म्हणून नाही तर एक भारतीय म्हणून आपले कर्तव्य बजावत असतो. आज हजारो लाखो तरुण देशाच्या विविध भागांमध्ये नोकरी व रोजगाराच्या निमित्ताने राहत असतात. अशा वेळेस त्यांनाही त्रास देण्याचे प्रकार सुरू होतात. बंगलोर मध्ये सुद्धा हजारो मराठी तरुण सॉफ्टवेअर आणि इतर कंपन्यांमध्ये नोकरी करीत आहेत. तसेच पुण्यामध्ये सुद्धा अनेक कन्नड तरुण नोकरी करीत आहेत. ज्यावेळेस अशा पद्धतीचा सीमा विवाद निर्माण केल्या जातो त्यावेळेस अशा इतर प्रांतात नोकरी करणाऱ्या लोकांमध्ये दहशत निर्माण होते. अनेक वेळा कन्नड रक्षण वेदिका, मनसे, शिवसेना अशा संघटनांच्या द्वारा कायमस्वरूपी लोकांमध्ये द्वेष निर्माण होईल अशा पद्धतीच्या घटना व प्रसंग घडविले जाऊ शकतात. हे थांबविणे आवश्यक आहे. मागच्या साठ-सत्तर वर्षांमध्ये बेळगाव मध्ये सातत्याने मराठी भाषिकच महापौर झालेला आहे. यावरून आपल्या असे लक्षात येईल की 60-70 वर्षे कर्नाटक मध्ये राहून सुद्धा मराठी मने ही मराठीच राहिलेली आहे. ती कन्नड बनू शकलेली नाही. त्यांची भाषा, त्यांची संस्कृती, त्यांचे सण उत्सव हे मराठीच राहिलेले आहे. यावरून आपल्या असे लक्षात येईल की कोणालाही जबरदस्तीने कन्नड अथवा तामिळ बनविणे शक्य नाही. जबरदस्ती करण्याचे प्रयास केल्यास राष्ट्रीय एकात्मतेला तडा जाऊ शकतो व त्याचे दुष्परिणाम देशाला व समाजाला भोगावे लागू शकतात. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. यावेळेस केंद्र, कर्नाटक व महाराष्ट्रात भाजपाचे सरकार आहे. त्यांनी यावेळेस सीमा विवाद कशा पद्धतीने सोडविला जाऊ शकतो याचा आदर्श घालून देणे आवश्यक आहे. अन्यथा कन्नड रक्षण वेदिका असेल किंवा शिवसेना मनसे असेल अशा प्रादेशिक अभिनिवेश निर्माण करणाऱ्या संघटनांचे फावेल व आपली राजकीय पोळी भाजण्याच्या नादामध्ये हे लोक राष्ट्रीय एकात्मतेला कायमस्वरूपी बाधा पोहोचवून बसतील. मुख्यमंत्री कर्नाटकचा असो वा महाराष्ट्राचा त्यांनी सामंजस्याची भूमिका घेणे आवश्यक आहे. त्यांच्या त्यांच्या प्रदेशात राहणारे लोक मग ते कोणतीही भाषा बोलणारे असेल त्यांचे कायद्याने संरक्षण करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. राज्यात कायद्याचे सरकार आहे गावगुंडांचे नाही हा विश्वास सर्वसामान्य माणसाला येण्यासाठी सीमा विवाद सामंजस्याने मात्र प्राथमिकतेने सोडविला गेला पाहिजे असे वाटते.

# खासदार महोत्सवाच्या निमित्ताने साहित्य, कला, क्रीडा व संस्कृतीचा संगम



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

नागपूरमध्ये खासदार महोत्सवाची सुरुवात 2018 पासून झाली.त्यानिमित्याने दरवर्षी नागपूरात खासदार महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केल्या जातो.त्याचप्रमाणे याही वर्षी दिनांक 2 डिसेंबर पासून खासदार महोत्सवाला सुरुवात झाली व विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून देशाच्या संस्कृतीचे दर्शन दिनांक 11 डिसेंबरपर्यत सर्वांनाच पहायला मिळाले यापध्दतीने कार्यक्रमाचे आयोजन केंद्रीय मंत्री माननीय नितीनजी गडकरी यांनी नागरिकांसाठी आयोजित केलेले आहेत याकरिता त्यांचें स्वागतच.याकार्यक्रमात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

यात खास करून महाराष्ट्रासह भारतीय संस्कृतीचा वारसा पथनाट्याच्या व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवील्या जाते.या कार्यक्रमात मुख्यत्वेकरून संपूर्ण धर्माची जोपासना आपण कशी टीकवायची याचेही हुबेहूब चित्रिकरण पहायला मिळते.सध्या सुरू असलेल्या  खासदार महोत्सवाच्या निमित्ताने आपल्याला महाराष्ट्राचा वारसा दिसून येईल.नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची चालना देण्याचे काम माननीय श्री नितीनजी गडकरी यांनी खासदार महोत्सवाच्या निमित्ताने आतापर्यंत दाखविले आहे.पुढेही आपली संस्कृती टिकून राहावी या उद्देशाने याहीवर्षीही आपल्याला खासदार महोत्सव पहायला मिळत आहे.सध्याच्या परिस्थितीत भारतातील अनेक राज्यांमध्ये सांस्कृतिक वारसा लुप्त होतांना दिसत आहे.परंतु विदर्भासह महाराष्ट्राला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा सारखा पूत्र मिळाल्याने खासदार महोत्सवाच्या निमित्ताने सांस्कृतिक वारसा जिवित झाल्याचे दिसून येते. भाजपा सत्तेत असो वा नसो नितीन गडकरी यांनी नागपूरमध्ये अनेक सांस्कृतिक कार्यक्रम,कला, साहित्य, क्रिडा,सामाजिक उपक्रमांमध्ये खंबीरपणे भूमिका बजावुन आपले योगदान देत असतात. आज गडकरींच्या पुण्याईने नागपूरसह संपूर्ण भारतात उड्डाण पुलांचा बोलबाला दिसून येतो.नागपूरच्या विकासाची गोष्ट केली तर आज नागपुरचा संपूर्ण कायापालट झाल्याचे दिसून येते.हीबाब संपूर्ण देश अनुभवत आहे.नागपूर हे भारताचे मध्यवर्ती ठिकाण व केंद्रबिंदू आहे.आपातकालीन परिस्थितीत सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नागपूरची निवड केली जाते. त्या अनुषंगानेच नागपूरचा विकास होत असावा. विदर्भाला संतांची भूमी म्हणून सुद्धा ओळखले जाते. संत, थोर महात्म्यांच्या आचार विचारांची जपणूक हीच खरी संस्कृती होय.आज आपली संस्कृती काय आहे हे सर्वांनाच माहीत आहे.परंतु गडकरींच्या अनेक कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सांस्कृती जोपासण्याचे कार्य होत असल्याचे दिसून येते. आजच्या पिढीला आपल्या संस्कृतीचा विसर पडत असल्याचे दिसून येते.परंतु नवीन पिढीला सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राची संस्कृती किंवा देशाची संस्कृतीचे जतन कसे करावे याची माहिती अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून मिळते. खासदार महोत्सवाच्या माध्यमातून आपल्या संस्कृतीला जिथे-कुठे खिंडार पडले असेल.त्याला दुरुस्त करण्याचा विडा गडकरींनी घेतल्याचे दिसून येते.1947 नंतर नागपूरमध्ये अनेक खासदार होवून गेले.परंतु गडकरींचा काळ हा वाखाणण्याजोगा आहे. कारण खरोखरच महाराष्ट्राचा व देशाच्या विकास मार्ग मोकळा करणारा आणि सांस्कृतिक वारसा टिकविणारा असल्याचे दिसून येते.ज्या दिवसापासुन खासदार झाले तेव्हा पासून त्यांचा कामाचा सपाटा जोरदार सुरू आहे.त्याचप्रमाणे त्यांच्या कामाची चर्चा भारतातच नाही तर संपूर्ण जगभरात प्रसिद्ध आहे ही नागपूरकरांसाठी व महाराष्ट्रासाठी मोठी अभिमानाची गोष्ट आहे.गडकरींनी विकासाची सुरूवात उड्डाण पूलापासुन केली ती आज विकासाच्या शिखरापर्यंत जाणवु ठेपली आहे आणि आता विकासासोबतच सांस्कृतीची जोपासना करण्याचे दायित्व त्यांनी स्वीकारल्याचे दिसून येते.यासाठी त्यांनी आपली ताकद पुर्णपणाला लावली आहे.भारतात अनेक ठिकाणी आपल्याला जातीय दंगली दिसून येतात. परंतु नागपूरमध्ये कोणतीच जातीय दंगल अथवा टोकाचे मतभेद व वाद झाल्याचे दिसून येत नाही.



नागपूरमध्ये संघ कार्यालय, दीक्षाभूमी,ताजबाग,गणेश टेकडी,चर्च इत्यादी अनेक धर्मांची पुरातन स्थळे आहेत.त्याचे जतन सर्वधर्मीय करतात.गडकरी यांचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व धर्मांच्या लोकांना घेऊन चालने व समाजामध्ये सर्वच धर्माविषयी आदराची भावना निर्माण करून सर्वांना एकसुत्रीत बांधून ठेवण्याचे महत्वाचे काम गडकरींनी केले आणि करीत आहेत. खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून समाज कार्यासह लोकांनी आपल्या संस्कृतीचे जतन कसे करता येईल याची जाणीव करून देण्याचे कार्य गडकरी करीत आहे.नागपुरला राजकीय दृष्ट्या संघभुमि म्हणून भारतासह जगभर  ओळखले जाते. परंतु आजही नागपूरमधील हिंदू-मुस्लिम-शिख-ईसाइ-बौध्द एकोप्याने राहतात.ही नागपूरसाठी व  नागपूरकरांसाठी सन्मानाची बाब आहे.गडकरी नागपूरचे खासदार झाले म्हणूनच विकास झाला आणि त्यांच्यामुळेच संस्कृतीचे जतन कसे करावे याची शिकवण खासदार महोत्सवाच्या माध्यमातून युवकांना मिळत आहे.आज गडकरींच्या कामाची शैली व एकाग्रता लक्षात घेता ते भारतासाठी "विकासपुरुष"आहेत.खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव पुनर्जीवीत करण्याचे काम श्री गडकरीजी करीत आहे. खासदार महोत्सवामध्ये कला, संस्कृती, साहित्य, क्रिडा, यासोबतच मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे दर्शन सुध्दा होते.श्री नितिनजी गडकरी यांच्या उपक्रमांना माझा सलाम.देशाची संस्कृती टिकवून ठेवायची असेल तर राज्या-राज्यातील सीमावाद ताबडतोब संपुष्टात आलाच पाहिजे यातच देशाची एकता व अखंडता दिसून येईल.

# महाराष्ट्र- कर्नाटक सीमा प्रश्न कोण पेटवतोय ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र - कर्नाटक सीमा, संयुक्त महाराष्ट्र व जम्मू- काश्मीर हे सर्व प्रश्न काँग्रेस राजवटीत निर्माण झालेले आहेत.या संघर्षाने अनेकांचा बळी घेतला आहे.महाराष्ट्र -कर्नाटकचा सीमांवादाचा प्रश्न ६६ वर्षापासून पासून आहे.या दोन्ही राज्यात अनेक वर्षे सत्ता होती.तेंव्हा केंद्र व राज्य सरकार हा विषय का सोडवू शकलेले नाही? याचे उत्तर शकणार नाही. पण हे या पापाचे खापर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस व उध्दवसेना भाजपावर फोडत आहेत.स्वातंत्र्यानंतर राज्यपुनर्रचना आयोग१९५३ मध्ये स्थापन केला.नंतर न्या. फाजलअली,ऱ्हदयनाथ कुंझरू, सरदार के.एम. पण्णीकर या तीन सदस्यीय प्रांत रचना आयोगाची नियुक्तीकेली.**

या आयोगाने १९५६ मध्येभाषावार प्रांत रचनेची शिफारस केली. तेंव्हा विजापूर,धारवाड, गुलबर्गा, बीदर आणि बेळगाव हे जिल्हे म्हैसूर राज्याला म्हणजे कर्नाटकाला जोडले गेले. तसेच विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रसह महाराष्ट्र व सौराष्ट्र गुजरातसह गुजरात हे दोन राज्य मात्र नाकारली. नंतर व्दिभाषिक गुजरात व महाराष्ट्र निर्मिती करण्याचे कारण नव्हते. त्यातून संयुक्त महाराष्ट्राची मागणी पुढे आली. तसेच मराठी भाषिक भाग कर्नाटक जोडल्याने हा सीमावादाचा प्रश्न निर्माण झाला. यावेळी १९८१ च्या जनगणनेनुसार बेळगावात कन्नड भाषिक ६४ टक्के व मराठी भाषिक २६ टक्के दाखविण्यात आले. तर सीमावर्ती भागात मराठी भाषिक संख्या २० लाखाच्यावर आहे,असा महाराष्ट्राचा दावा आहे. मराठी भाग कर्नाटकात गेल्याने बॉम्बे राज्यात संतापाची लाट उसळली व आंदोलन सुरू झाले. त्यात २२ आक्टोबर १९६६ रोजी केद्राने न्या. मेहरचंद महाजन यांचा एक सदस्यीय आयोग नेमला गेला. या आयोगाने तर ८६५ पैकी२६४ गावे महाराष्ट्रात समावेश करण्याची शिफारस केली. इतकेच नव्हे या आयोगाने बेळगाव महाराष्ट्राला देण्याचा दावा फेटाळला.राज्यात सीमाप्रश्नावर १९६९ मध्ये शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार शिवसैनिकांनी मुंबईत आंदोलन केले. त्यात ६९ शिवसैनिकांनी प्राणाची आहूती दिली. कोल्हापूर येथे परिषद घेतली गेली होती. हा वाद आता आंदोलनाने आरोप- प्रत्यारोपाने सुटणार आहे का? सीमा प्रश्नासबंधात तत्कालिन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी२००४ मध्ये सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. तेंव्हा कर्नाटक सरकारने राज्य निर्मिती, सीमा वाढविणे,गावांचा समावेश करणे व वगळणे हा न्यायालयाचा अधिकार कक्षेत येत नसून संसदेचा आहे, असा अर्ज दिला होता.या सीमा विषयावर १५ वेळा सुनावणी झालेली आहे. तेंव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची प्रतिक्षा करण्याशिवाय पर्याय नाही. पण राजकीय नेते या विषयावरून तरूणांचे माथे भडकवित आहेत? हा वाद भावनिक व दोन्ही राज्याच्या प्रतिष्ठचा विषय आहेच पण तो विशेष म्हणजे राजकीय प्रश्न बनलेला आहे. महाराष्ट्राचे कर्नाटक, तेलंगणा हे राज्य शेजारी राज्य आहेत, ते शत्रू राज्य नाहीत. या दोन्ही राज्यात लोकांचे एकमेकाचे रोटी बेटीचे, व्यवहारिक, धार्मिकदृष्ट्या रोजचे नाते सबंध आहेत. या दोन्ही राज्यात लोकांचे दैनदिन जाणे- येणे, व्यवहार असतो. हे नाते सबंध कधी तुटणारे नाहीत. आज२०२२ मध्ये अचानकपणे न सीमाचा वादाचा प्रश्न निर्माण झाला? याचे कारण कर्नाटक सीमेवर असलेल्या सांगली जिल्ह्यातील जत इतर ग्राम पंचायत पाणी प्रश्न व विकासाकडे दुर्लक्ष केल्याने कर्नाटक राज्यात जाण्याचा २०१२ मध्ये ठराव समंत केला होता. तरी सरकारने विशेष लक्ष घातलेले नाही. जेंव्हा जतच्या जनतेनी कर्नाटकी झेंडे हाती घेतली, तेंव्हा कर्नाटकने त्यात तोंड घातले. इतकेवर्षे काँग्रेस, राष्ट्रवादी नेते 'जाणता राजा' झोपलेले होते. कर्नाटकप्रमाणे प्रश्न नांदेड जिल्ह्यातील गावे आंध्र व आता तेलंगणा जाण्यास इच्छूक आहेत. या सीमेलगतच्या गावाकडे नांदेडचे आशोक चव्हाण यांनी कधी लक्ष दिले नाही.कुंडलवाडी ते धर्माबाद रस्त्याची दुरावस्था अनेक वर्षापासून आहे. कुंडलवाडीपासून कंदकुर्तीमार्गे बोधन जाणारा एक मार्ग आहे. या मार्गावर महाराष्ट्रातील काही गावे आहेत काँग्रेस नेते चव्हाण कधी सीमेलगतच्या गावांना भेट दिली होती का? जर गेले असतील सीमेलगतच्या गावांच्या नियोजनबध्द विकास आराखडा तयार केला होता का? या गावांचे प्रश्न कोणते होते? ते किती प्रमाणात सोडविले गेले? याचे उत्तर ते देऊ शकणार नाहीत. केवळ निवडणूका डोळ्यासमोर ठेऊन काँग्रेसला मताचे झुकते माप देणाऱ्या गावाला निधी दिला जातोय! नांदेड महापालिकेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन खर्च केला जात आहेत.शहरातील मुख्य चांगले रस्ते तोडफोड करून सिमेंटचे रस्ते केले जात आहेत. शहरातील वार्डातील रस्त्यांची अवस्था काय? नांदेड मनपा कर्जापायी गहाण ठेवली गेली. या रस्त्याच्या कामात ६० टक्के भ्रष्टाचाराचा वाटा ठरलेला आहे. उगाच! भारत जोडो यात्रेत कोट्यवधी पैसा उधळला जात आहे.केवळ रस्ते कामावर भर दिला जातोय. हेच रस्ते दाखवून चव्हाण म्हणजे नांदेडचे विकास पुरूष,असा डंका मनपा निवडणुकीत वाजविला जाणार! आता तर केंद्र व राज्य शासनाने निधी देत आहे, तोही चव्हाणांच्याच पाठ पुराव्यामुळे मिळाला, असा प्रचार केला जातोय!.यात नांदेडात भाजपा कमजोर आहे. मागे फडणवीस सरकारने तर नांदेडला झुलविले,ते तर पर्यटक म्हणून पक्षाचे नेते व नातेवाईकांच्या घरी भेटण्याशिवाय जातात. शिंदे सरकार तेच करत आहे! ते नांदेडला आले होते सामान्यांचे पोतेभर निवेदने घेवून गेले त्याचे काय केले? समुद्रात टाकले वाटते.? आता शिंदे गटाचे लोकप्रतिनिधी विकास कामांचे उदघाटने जोरात करत आहेत. कारण त्यामागे अर्थकारण दडलेले आहे. या विकास कामात टक्केवारी ठरलेली असते.यासाठी पैसा जनतेचा फलक आमदाराचा व्वा! तो कशाकरिता? या फलकावर कंत्राटदाराचे नाव दिले जात नाही? शिंदे सरकार विकास कामांची स्थगिती थांबवावी,अशी मागणी चव्हाण यांनी केली. विकास कामांना चुकीची मंजूरी अथवा निविदा ठराविक असेल तर ती कामे रद्द करा! ते जनतेला सांगा! स्थगिती कशाकरिता? महाविकास आघाडीचे सरकार स्थगिती सरकार बनलेले होते,त्याचा विसर पडलाय! चव्हाणांना आता सीमेवरील गावांची आठवण झालेली दिसतेय! कर्नाटक व तेलंगणा सीमेवर असलेल्या गावांच्या विकास प्रश्नाकडे महाराष्ट्र सरकार दुर्लक्ष करत आलेले आहे.त्याचा हा परिणाम आहे. या गावांनी तेलंगणा राज्यात जाऊ असे म्हणाले आहेत. सीमेलगतच्या गावे केवळ महाराष्ट्राला सरकारला भीती दाखवत आहेत,कारण त्या राज्यात जाऊनही विकास होणार नाही,हे त्यांनाही माहित आहे. केवळ या निमित्ताने महाराष्ट्र सरकारचे लक्ष वेधत आहेत. पण मागणीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. कारण ग्रामपंचायतीने इतर राज्यात जाण्याचा ठराव प्रस्ताव करून उपयोग नाही. विधानसभेत स्थलांतरित गावांचा प्रस्ताव विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर व्हावा लागतो.त्यानंतर तो राष्ट्रपतींकडे




सहीसाठी पाठविला जातो. तेंव्हा कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई ओरड करत ती निरर्थक आहे.त्यांना कन्नडी भाषिकांची सहानुभूती मिळवायची व राजकारण करावयाचे आहे. सीमावर्ती भागातील गावांच्या लोकांनी टोकाची भूमिका का घेतली ?कारण याभागातील दोन राज्यांना जोडणारे रस्ते,पाणी,वीज या मूलभूत सोयीकडे महाराष्ट्र काँग्रेस सरकारने १९६० पासून गांर्भियाने लक्ष दिलेले नाही,हेच मुख्य कारण आहे.सीमा भागाचा प्रश्न राहिला बाजूला त्यावर मात्र राजकीय शिमगा सुरू झालेला आहे. कर्नाटक व महाराष्ट्रातील मंत्री,नेते चिथावणी देणारे वक्तव्य दिले जात आहे.यातून दोन्ही राज्यात सामाजिक तणाव वाढेल,सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होईल,नाहक लोकाचा बळी जाईल याची भीती वाटत नाही? कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री बोम्मई हे तर आक्रमकपणे बोलून,ते मराठी भाषिकांची अवमान करीत आहेत.त्यांनी तर महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांनी कर्नाटकमध्ये येवू नये,हे म्हणाले आहेत.आता कर्नाटकात जाण्यासाठी पासपोर्ट काढावे लागेल की काय?तर महाराष्ट्रातील भाजपा व शिवसेना नेते 'जश्याच तसे उत्तर' देण्याची भाषा करत आहेत.म्हणजे नेमके काय करावयाचे? हिंसक आंदोलन करणार आहात का?उध्दव ठाकरे यांनी तर वादग्रस्त भाग केंद्रशासित करावा असे म्हटले तसेच त्यांनी पूर्वी 'कर्नाटक व्याप्त महाराष्ट्र' सबांधले होते.महाराष्ट्रातील राजकीय नेते मात्र एकमेकांना टीका करण्यात मग्न आहेत.यातून सीमा प्रश्न सुटणार आहे काय? कर्नाटकच्या मुख्यमंत्री बोम्बई हे हा प्रश्न चर्चेच्या माध्यमातून व न्यायालयातून हा प्रश्न सोडविता येईल असे मत मांडण्याऐवजी ते आक्रमक बोलून तेआगीत ओतत आहेत. संवैधानिकपदावर बसलेल्या व्यक्तीला अशी भाषा करणे मुळीच शोभणारी नाही.सुदैवाने कर्नाटक व महाराष्ट्रात भाजपाचे सरकार आहे, तेंव्हा सामंजस्याची भूमिका दोन्ही राज्याच्या नेतृत्वाने घेतली पाहिजे. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वतः पुढाकार घेतला व कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांशी सपर्क साधला. त्यांनी सीमा प्रश्नाला वेगळे वळण देऊ नका! हिंसक हल्ले करणाऱ्यावर कारवाईची म्हणाले, हे चांगले झाले. या प्रश्नावर बेतालपणे बोलणाऱ्या बोम्बईचे कान टोचले पाहिजेत. यात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार हे सत्तेत असताना सीमा प्रश्न सोडवू शकले नाहीत.आता 'कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे'असे सीमा प्रश्नांचे झालेले आहे.आता केद्र व कर्नाटक, महाराष्ट्रात भाजपाचे सरकार आहे,फडणवीस यांनी याबाबत पुढाकार घ्यावा, हा प्रश्न सहज सुटेल असे चिन्ह दिसत नाही, तेंव्हा न्यायालयाचा निकाल सर्वांनी मान्य करावा.तोपत सीमा प्रश्नावर संयम ठेवणे, व न्यायालयीन निकालाची प्रतिक्षा करणे हाच मार्ग आहे.पण शरद पवार आता संयम अंत पाहू नका! असे म्हणत आहेत. १९८५ मध्ये कोल्हापूर येथे सीमा परिषद होती.त्यावेळी एस.एम. जोशी,माधवराव गायकवाड, गोविंद पानसरे, आणि शरद पवार तेथे गेले होते. तेंव्हा ते गनिमीकाव्याने बेळगावात गेले होते,पोलिसांनी ताब्यात घेतले व कोल्हापूरला आणून सोडले, त्यासाठी पोलिसांच्या लाठ्या खाल्या हे चुकीचे आहे. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार त्यावेळेस शिवसेनेत असलेले छगन भुजबळ, एकनाथ शिंदे व इतर सेनेच्या नेते कर्नाटकात घुसले होते.तेंव्हा मात्र पोलिसांचा त्यांना लाठीचा प्रसाद दिला! यांना जेलमध्ये टाकले होते. पवारांना या आंदोलनाची आठवण होत आहे, मग तर सत्तेत असताना तेंव्हा कर्नाटकातील मराठी जनतेची आठवण का झाली नाही?त्यांनी प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घतला नाही? काँग्रसने हे भिजत घोंगडे का ठेवले? हे ठणकावून का सांगत नाहीत. तेंव्हा कर्नाटक सीमा प्रश्नावर आक्रमक का झाले नाहीत? आता केद्र व राज्यात सत्ता गेल्यानंतर सीमा प्रश्नाचे प्रेम उफळून येत आहे.सीमा प्रश्नावर राज्यात शेतकरी कामगार पक्षाने अनेक आंदोलने केली. शे.का पक्षाचे ज्येष्ठ नेते केशवराव धोंडगे म्हणाले होते. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करताना ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांनी मागासभागाला झुकते माप दिले जाईल,तसेच अन्याय होऊ दिला जाणार नाही,असे वचन दिले होते.पण काँग्रेसने ते पाळलेले नाही. मराठवाड्याच्या वाट्याला काय मिळाले?असा प्रश्न केला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मराठवाड्यातील जनतेला विकासासाठी आंदोलन करावे लागले. तत्कालिन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी मराठवाड्यातील प्रकल्यांना निधी देत असताना काँग्रेसच्या नेत्यांनी विरोध केला होता.त्यावेळी त्यांचा अवमान केला गेला पण चव्हाणांनी मराठवाड्याच्या विकासाचा संघर्ष सोडला नाही.काँग्रेस नेतृत्वाने मागासभागाच्या विकासाकडे दुर्लक्ष केले गेले त्यातून स्वतंत्र विर्दभ राज्याची मागणी पुढे आली. काँग्रेस सरकारने महाराष्ट्रात अनेक प्रश्न निर्माण करून ठेवलेले आहेत. महाराष्ट्रापासून मुंबई तोडण्याचा घाट काँग्रेसचा होता ना!संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत १०७ जणाचा बळी कोणी घेतला?महाराष्ट्राच्या निर्मितीत काँग्रेसचे किती योगदान आहे सयुंक्त महाराष्ट्र विरोधी कोण होते? त्या काँग्रेसच्या पंगतीत उध्दव ठाकरे सेना जाऊन बसली आहे. महाराष्ट्रात भाजपा व बाळासाहेब शिवसेना पक्ष सत्तेत आल्यानंतर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस,व उध्दव ठाकरे यांचा तीळपापड होत आहे.हे शिंदे सरकार पडणार! निवडणुकीच्या तयारी लागा! याचा वावड्या उठविल्या जात आहेत. त्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा राजकारणासाठी केला जात आहेत. आज राज्यातील तरूणांना रोजगार, नोकरीची गरज आहे. छत्रपती शिवरायांच्या नावावर व सीमा प्रश्नावरून तरूणांचे माथे भडकविण्याचे पाप करू नका! महाराष्ट्र -कर्नाटक सीमावादाचे खापर भाजपावर फोडण्याचे कारस्थान केले जात आहे. अश्या प्रश्नातून सामाजिक तणाव निर्माण होईल, निष्पाप लोकांचा बळी जाईल! याची त्यांना भय वाटत नाही. प्रत्येक आंदोलनात मरतो तो सामान्य माणूस! राजकीय नेत्यांच्या केसालाही धक्का लागत नाही.पण यातून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व उध्दव ठाकरे सेनेला मराठा समाजाची मते भावनिक मते वळवायची आहेत!त्यासाठी राजकीय रणनीती आहे. महाराष्ट्रातील बाभळीच्या (नांदेड) पाणी प्रश्नावर आंध्रप्रदेशातील सर्व लोकप्रतिनिधींनी महाराष्ट्रात येवून आंदोलन केले. महाराष्ट्र पोलिसांनी त्यांना अटक केली पण सन्मानपूर्वक एका गेस्ट हाऊसमध्ये ठेवले होते. त्यांना आवडीचे इटली -वड्याचा नास्टा व जेवणाची सोय पाहूणचार म्हणून केला व विमानाने परत पाठविले.तामीळनायडू लोकप्रतिनिधी पाणी प्रश्नावर संघटीत होतात! तसेच कर्नाटक राज्यातील मराठी भाषिक व महाराष्ट्र एकीकरण समिती६६ वर्षापासून लढा देत आहे, यात सरकार कन्नड भाषेची सक्ती करत आहे. मराठी आंदोलकावर लाठ्या -काठ्या खाव्या लागत आहेत, अनेक शहीद झाले! ते मराठी जनता महाराष्ट्रात येण्याची वाट पहात आहेत.तर दुसरीकडे महाराष्ट्रातील मराठी जनता कर्नाटक व तेलंगणा जाण्याचा जाहीरपणे मागणी करत आहेत.हे प्रगतशील, पुरोगामी महाराष्ट्र राज्याचे अपयश नाही काय? हा महाराष्ट्राचा अपमान नाही काय? हा राजकीय करंटेपणाचा दुष्परिणाम नाही काय?याची आपणाला लाज वाटत नाही! महाराष्ट्राचे दुर्देव असे की,राजकीय नेते म्हणजे,खेकड्याची जात सत्ताभोगी आहेत.राऊत सारखे नेते रोज 'महाराष्ट्राचा अपमान' असा रोज गळा असतात,त्याचा काही उपयोग नाही!महाराष्ट्रातील सर्व राजकीय नेत्यांना राजकारण बाजूला ठेऊन एकत्र यावे लागेल!त्यांना सनदशीरमार्गाने कर्नाटक जाऊन आंदोलन करावे! तरच! देशाला महाराष्ट्राची शक्ती दिसेल!

# वावराला अश्रू पाजणाऱ्या हृदयातील सुगंधी जखमा



प्रकाश क्षीरसागर
संपर्क क्र. ९०११०८२२९९


आधुनिक केसरी

**आपल्या पुस्तकावर आई आणि वडील या दोघांचीही नावे देण्याची पद्धत आजकाल रुढ होत आहे. ती रुढ किंवा परंपरा यशवंत हिराबाई त्र्यंबक पगारे यांनी जोपासली आहे. 'हृदयातील सुगंधी जखमा' हा त्यांचा गझलसंग्रह. यातल्या अनेक गझल या आनंदकंद छंदात आहेत. पहिलीच गझल 'जखम फुलांची' ही गझल दोन ओळीतली करुण कहाणी सांगते. पानात बांधलेली जपली जखम फुलांची म्हणत ते शेवटी म्हणतात की, सांजेची तळमळ ही उद्याचा सूर्योदय पाहण्याचीच असते. त्यासाठीच पश्चिमेकडून पूर्वेकडेच जाण्याची धडपड सगळ्यांची असते. ते म्हणतात, 'मार्गात धोंड यावी। नीती खरी असावी आचार शुद्धतेची ती पंढरी असे म्हणत हा गझलकार देवालये बांधू नका तर अंतरात माणसांची जाणीव ठेवा असे बजावतो.**

ते मागणे मागतात की, शेतातल्या बळीला काही तरी मिळावे । केव्हातरी दिवाळी त्याला बरी मिळावी।। अल्पभूधारक शेतकऱ्याच्या नशिबी सदैव दुःखच असते. त्यामुळे त्याला दिवाळीतरी सुखाचे चार घास मिळावे, अशी त्याला नेहमी वाटते.

पावसाचे पाणी तर महाराष्ट्राच्या अनेक भागात मिळतच नाही कोरवाहू जमिनीला सिंचायला गझलकार आपले अश्रू ढाळतो. हा शेर पाहा ।। काल माझे पीक सारे भर उन्हाने जाळले । दोन अश्रू वावराला शेवटी मी पाजले.दाखल्यावर जात पाहिल्यावर कसे तुच्छतेने लोकांनी पाहिले हे वास्तव ते सांगतात.

या संग्रहातील आई या गझलेतील सगळ्यांना एकत्र बांधून ठेवते. जिंकायचा लढा या निर्धारानेच तो लढतो. दुष्काळ, गुन्हा असावा, बड आसवाचो या गझल जीवनाचे तत्त्वज्ञान सांगतात. किनारा या गझलेतही आशावाद आहे. येवो तुफान मोठे येवो उधाण वारा । हातात दोर माझ्या गाठावयाचा किनारा असा आशावाद ते पेरतात. सल काटेरी, घडवत आलो आदी गझलांतून वाचकांना ते खिळवून ठेवतात. जीवन आसमध्ये मनाची वेसण घालण्यास ते मनाला सांगतात. निसर्गाला माणूस ओरबाडतो आहे, त्यावरील शेर हव्यास नको सर्व मिळावे मला सर्वदा असे म्हणत हक्क मालकी नकोस दावू निसर्गावरी धुंद फुलांची हवा मोकळी आंदण आहे ।। असे बजावतत आहेत. या गझलेत एका शेरात त्यांनी मूर्ख शेखचिल्लीचे उदाहरण त्यांनी दिले आहे.




कठोर माणसे कशी भावनाविहीन झाली आहेत, हे सांगतात. कसे म्हणावे मध्ये त्यांनी संसाराचा डोंगर चढुनी थकलो मित्रा असे सांगत कुपोषणाने बळी चालले गरीबा घरी माय पित्यांची तडफड नाही कसे म्हणावे असे ते म्हणतात, या गझलेत ते नवससायासादि रुढींवर आसूड ओढतात. हवे आता, तुझे गाणे या गझल विचार करायला लावणाऱ्या आहेत. तत्त्व या गझलेत भोंदू बाबांवर टीक करताना प्रेमातही ते रंगतात गालावरच्या गोड खळीला कोण भूलला नाही, असा सवाल ते करतात. दारात कसायाच्या या गझल मध्ये त्यांनी रुढी परंपरांवर फटकारे मारून ते स्वप्नात कधी काळी येतात अशा रात्री असा इशाराही ते देतात. एकंदर या संग्रहात त्यांनी जनसामान्यांची व्यथा उजागर करण्याचा प्रयत्न केला आहे. तणाव या गझलमध्ये गावातील तणावांची कथा ते सांगतात. नेत्यांनी फक्त आश्वासने देतात त्याने समाधान कसे होणार येणार आज मोर्चा असा सवाल करून उभा पहारा देणारा हा कवी आहे. एकंदर जीवनाला सर्वांगाने भिडणारा हा संग्रह आहे. केवळ दुःख मांडत बसण्यापेक्षा ते सुखी जीवनाचा मंत्र सांगतात.

हृदयातील सुगंधी जखमा
**गझल संग्रह**
**पृष्ठे १०४, मूल्य २०० रुपये**
**प्रकाशक - नेहा पंकज महाजन**
**महाजन पब्लिशिंग हाऊस, पुणे**

# ट्रकमधून ४९ लाखांचा कुरिअरचा माल लंपास

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील अजंग गावाजवळ उभ्या ट्रकचे इलेक्ट्रानीक लॉक तोडून चोरट्यांनी निम्मे ट्रक खाली करीत त्यातील ४९ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला. ही घटना दि.१ डिसेंबर रोजी घडली. याप्रकरणी काल तालुका पोलिसांत गुन्हा दाखल होताच पोलिस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांनी चौकशी करत असताना पारोळ्याहून एका संशयीताला ताब्यात घेतले. त्याला न्यायालयात हजर केले असता चार दिवस पोलिस कोठडी देण्यात आली. दरम्यान, संशयीताची चौकशी केली जात आहे. ब्लु डार्ट कुरीयर कंपनीचा माल घेतलेला कनिफनाथ रोडलाईन्सचा ट्रक (क्र.एमएच१४/जेएल ८२९९) दि.३० नोव्हेंबर रोजी लॅपटॉप, एलईडी टीव्ही अशा इलेक्ट्रॉनिकच्या वस्तु घेवून निघाला होता. दि.१ डिसेंबर रोजी पहाटे दीड वाजेच्या सुमारास हा ट्रक धुळे तालुक्यातील अजंग शिवाराकडे येत होता

त्यादरम्यान या ट्रकचा एक संशयित वाहन पाठलाग करीत असल्याचे चालकाच्या निदर्शनास आले. दरम्यान चालकाने ट्रकमध्ये दोन-तीन प्रवाशांना देखील ट्रकमध्ये बसविलेले होते. त्या दोन जणांनी चालकाशी गप्पा मारतांना आम्ही देखील ट्रक ड्रायव्हिंग केले असून या क्षेत्रात काम केले असल्याचे सांगत विश्वासात संपादन करीत गप्पा मारीत अजंग शिवार गाठले. पहाटेची वेळ झाल्यामुळे व ट्रकमध्ये महागडी इलेक्ट्रॉनिकच्या वस्तू असल्याने चालकाने अजंग शिवारातील पाईप फॅक्टरीजवळ ट्रक रस्त्याच्या बाजूला उभा केला. तसेच काही वेळ झोपही घेतली. ही संधी चोरट्यांनी साधली. त्यांनी या ट्रकला लावलेले इलेक्ट्रॉनिक लॉक तोडून ट्रकमधील ४९ लाख १ हजार ९०८ रूपये किंमतीचे ५७ नग, एससीडी, लॅपटॉप व इतर माल लंपास केला.

दरम्यान चालकाला जाग आल्यावर त्याने बघितले असता चोरट्यांनी ट्रक निम्मे खाली केल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्याने ही बाब ट्रान्सपोर्ट मालकाला कळविली. माहिती मिळताच सकाळी दादाभाऊ आनंदराव जंजाळ (वय ३३ रा.एच.बिल्डींग, ११ वा मजला, प्लॉट नं.१११२ ता.हवेली, जि.पुणे) हे या ठिकाणी दाखल झाले. त्यांनी धुळे तालुका पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली.

त्यानुसार अज्ञात चोरट्यांवर काल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, पोलिस उपनिरीक्षक अनिल महाजन यांच्यासह पथकाने घटनास्थळी भेट देत पाहणी केली.गुन्हा दाखल होताच धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पोलिस निरिक्षक दत्तात्रय शिंदे यांनी तपासाची चक्रे गतीमान केली. चालकाच्या माहितीवरून त्याने बसविलेल्या प्रवाशांचा शोध सुरू केला. त्यातील अमोल रामराव सरदार (वय ३५ रा.हनुमानखेडे, ता.अचलपुर, जि.अमरावती) याला दि.६ डिसेंबर रोजी रात्री पारोळ्याहून ताब्यात घेण्यात आले.ट्रकला जीपीएस सिस्टीम लावलेली असल्याने हा ट्रक नेमका कुठे-कुठे थांबला? याची माहिती पोलिस घेत आहेत.



# कुठलेही पद नसताना पवन पाटील यांनी स्वखर्चातून केली विकासकामे

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील फागणे गावातील प्रभाग क्रमांक ०२ मध्ये कुठलेही पद नसताना पवन पाटील यांनी त्या गावात ना निधी ना योजना नसतात सुद्धा स्वखर्चातून विकास कामे केली आहे त्यामुळेच त्यांना ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत रिंगणात उतरण्यासाठी नागरिकांनी भाग पाडले आहे. नागरिकांच्या समस्यांवर आवाज उठवण्यासाठी फागणे गावातील प्रभाग क्रमांक 2 मध्ये त्यांनी उमेदवारी करण्याचा निश्चय केला आहे. त्यांना तसा ग्रामस्थांकडून प्रतिसादही मिळत आहे.

त्यांनी गावात स्वखर्चातून अनेक विकास कामांचा भूमिपूजन करून कामाची सुरुवात केली आहे. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत यश मिळो अथवा अपयश मिळो गोरगरिबांच्या मदतीला नेहमी धावून येणार असल्याचंही प्रतिपादन त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केले आहे. आज त्यांच्या हस्ते ते करत असलेल्या स्व खर्चातुन महादेव मंदिर व भगवान विर एकलव्य यांच्या मंदिराचे जीर्णोद्धार करुन प्रतिष्ठा करण्यात येणार आहे. प्रशासनाची कुठलीही मदत न घेता कुठल्याही योजनेची वाट न पाहता त्यांनी स्व खर्चातून विकास कामे करण्याचा संकल्प केला आहे. त्यामुळे पवन पाटील यांनाच मोठ्या मताच्या फरकाने आम्ही विजयी करू असा संकल्प प्रभाग क्रमांक 2 मधील मतदारांनी केला आहे.

# मातृशक्तीचा जेथे अवमान तेथे दुःखाची छाया

## महंत परमानंदगिरी महाराज



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भारतीय संस्कृतीने नेहमी स्त्री शक्तीचा सन्मान केलेला आहे, नारी शक्तीचा जेथे सन्मान होतो तेथे देवी-देवताचे अस्तित्व असते म्हणून समाजातील प्रत्येकाने नारी शक्तीचा सन्मान केला पाहिजे, जेथे मातृशक्तीचा अवमान होतो, तेथे सदा न कदा दुःखाची छाया असते असे अमृत वचन भांगसी माता गड-शरणापूरचे मठाधिपती श्री.श्री. १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरी जी महाराज यांनी बुधवार (ता.०७) रोजी वैजापुरात केले. राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराज यांच्या३३ व्या पुण्यस्मरण निमित्त आयोजित कार्यक्रमात परमानंदगिरी महाराज भक्तांना आपल्या प्रवचनातून सांगत होते, ते पुढे म्हणाले की, आज समाज मन कमालीची संकुचित होत आहेत, समाजमनात विकार व व्यसन घर करून आहेत, अशा समयी राष्ट्रसंत जनार्दन स्वामींचा संदेश मानवसेवा करण्याचा व समाज मन जोडून विधायक दृष्टी समाजाला देण्यासाठी धार्मिक कार्य व संतांचे प्रबोधन उपयुक्त ठरतात असेही ते पुढे म्हणाले. याप्रसंगी प.पू.दत्तगिरीजी महाराज यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक व सूत्रसंचलन सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. याप्रसंगी ज्ञानानंदगिरी महाराज, माजी आमदार भाऊसाहेब पा. चिकटगावकर,सचिन वाणी, राजेंद्र पा. साळुंके, डॉ.सुभाष भोपळे, डॉ.बाबासाहेब इंगळे रमेश हडोळे, राजू जोगीलाल राजपूत, भावलाल सोमासे, बापू गावडे, सर्वश्री वाघ, पुतळे, मोटे पाटील, अरविंद साळुंके, दाणे पाटील, शंकर मुळे, संगीता पुतळे, मंदा गायकवाड, आशा महाजन, मोटेताई यांची उपस्थिती होती.

# चैत्यभूमी येथे मोफत नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे येणाऱ्या भीम अनुयायींकरीता 'चर्मोद्योग कामगार सेना' अध्यक्ष मयुर कांबळे यांच्या मार्फत सालाबाद प्रमाणे याही वर्षी मोफत नेत्र चिकित्सा शिबिर आयोजीत करण्यात आले. अवघ्या देशातून येणाऱ्या हजारो भीम अनुयायींनी या शिबिराचा लाभ घेतला. या प्रसंगी शिवसेना विभागप्रमुख महेश सावंत, विभाग संघटिका श्रध्दा जाधव, साईनाथ दुर्गे, भटू अहिरे, सीमा लोकरे, महेश यादव, विनोद सातपुते यांच्या सह महिला व पुरुष पदाधिकारी आणि निष्ठावंत कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# घनसावंगी येथे १० आणि ११ डिसेंबरला मराठवाडा साहित्य संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** मराठवाडा साहित्य परिषदेचे 42 मराठवाडा साहित्य संमेलन घनसांगी येथे १०व११डिसेबर रोजी होणार आहे. या साहित्य संमेलनाचे उदघाटन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात येणार असून साहित्यिक डॉ शेषेराव मोहिते हे हे अध्यक्षस्थानी असतील तर वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख बाळासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे, अशी माहिती संमेलन स्वागताध्यक्ष माजी आमदार शिवाजीराव चौथे यांनी दिली. या साहित्य संमेलनाची जोरदार तयारी चालू आहे. यामध्ये भव्य दिव्य असा मंडप टाकण्यात आलेला आहे. स्वतंत्र भोजन व्यवस्था, पार्किंगची व्यवस्था, येणाऱ्या प्रमुख पाहुण्यांची राहण्याची व्यवस्था, तसेच जागोजागी बॅनर लावून साहित्य संमेलनाला उपस्थित राहण्याचा आव्हान करण्यात आले आहे.

# पहूर येथे दत्त जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील- पहुर येथे दत्त जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. पहूर पोलीस ठाण्यात दत्त जयंती निमित्त सत्यनारायण आणि महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पोलीस निरीक्षक प्रतापराव इंगळे व पोलीस उपनिरीक्षक अमोल गर्जे यांच्या हस्ते सपत्नीक महापूजा करण्यात आली. यावेळी श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष व पूजारी शिवभक्त रंगनाथ महाराज, दिलीप बाविस्कर, अजय जाधव यांच्यासह सर्व पोलीस कर्मचारी उपस्थित होते. शिवाजी सुरडकर यांनी पूजा विधि सांगितला. सत्यनारायण महापूजेनंतर पोलीस ठाण्याच्या आवारात महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दत्त जयंती निमित्त मंदिर फुलांनी व विद्युत रोषणाईने सजविण्यात आले आहे.



# निवडणूक निकालाने भाजपाची उलटी गिनती सुरु

## नाना पटोले : गुजरातमध्ये वारेमाप दारु, पैसा व सरकारी यंत्रणेचा गैरवापर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशभरातील निवडणुकांचे निकाल काँग्रेस पक्षासाठी समाधानकारक आहेत. हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसने भाजपाचा पराभव करून विजयाची पताका फडकवली आहे. तर राजस्थान व छत्तिसगड विधानसभा पोट निवडणुकीतही काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले आहेत. दिल्ली महानगरपालिका, हिमाचल प्रदेश व गुजरातमध्ये भारतीय जनता पक्षाची सत्ता होती पण आता फक्त गुजरातमध्येच त्यांना सत्ता राखता आली. निवडणूक निकालाने भाजपाची उलटी गिनती सुरु झाली असून केंद्रातही परिवर्तन अटळ आहे, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे. हिमाचल प्रदेश विधानसभा व पोटनिवडणुकीतील काँग्रेसच्या विजयानंतर दादर येथील टिळक भवन या पक्ष कार्यालयात ढोल, तोशे, फटक्यांच्या आतिषबाजीसह मिठाई वाटून विजय साजरा करण्यात आला. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, आजचे निकाल देशाच्या राजकारणाला कलाटणी देणारे आहेत. भारतीय जनता पक्षाने ईडी, सीबीआय, निवडणूक आयोगासह सर्व यंत्रणांचा वारेमाप गैरवापर केला. गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणात ड्रग्जची आयात झाली, मुंद्रा पोर्टावर मोठ्या प्रमाणात ड्रग्ज जप्त करण्यात आले, तरुणांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण, भय, भ्रष्टाचार या सर्व गोष्टींचा गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणावर वापर झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांना गुजरातमध्ये महिनाभर तळ ठोकून बसावे लागले. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचे गृहराज्य हिमाचल प्रदेशातही भाजपाचा काँग्रेसने पराभव केला आहे. देशातील जनतेने काँग्रेस पक्ष, मल्लिकार्जून खर्गेजी, सोनियाजी, राहुलजी, प्रियंकाजी गांधी यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला आहे. भारतीय जनता पक्ष व काही लोकांनी मोदी नावाचा बागुलबुवा उभा केला असून देशात कोणतीही लाट नसून लाट आहे ती जनतेची आणि देशातील जनता भाजपाचे द्वेषाचे राजकारण, ढासळती अर्थव्यवस्था, महागाई व बेरोजगारीला कंटाळली असून त्याचेच प्रतिबिंब या निकालात दिसून आले आहे. विरोधी पक्षांवर जनतेने विश्वास व्यक्त केला असून देशात आता परिवर्तन होण्यापासून कोणतीही शक्ती रोखू शकत नाही, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.






# थोर संत श्री संताजी जगनाडे महाराज जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** थोर संत श्री संताजी जगनाडे महाराज यांची ३९८ वी जयंती विधानसभेचे माजी अध्यक्ष तथा आमदार आदरणीय हरिभाऊजी बागडे नाना, नगराध्यक्ष सुहासभाऊ शिरसाठ व भाजपा शहराध्यक्षयोगेश मिसाळ यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी तैलिक महासंघाचे शहराध्यक्ष सुरेश मिसाळ, तैलिक महासंघाचे युवक तालुकाध्यक्ष वैभव दुतोंडे व शहराध्यक्ष अक्षय पाडळकर, उपनगराध्यक्ष अकबर पटेल, नगरसेवक शेखर पालकर, बाबासाहेब शिंगारे, गणेश राऊत, संतोष जाधव, गजानन नागरे, अजय शेरकर, वाल्मिक जाधव, एकनाथ ढोके, तसेच संतोष दुतोंडे, प्रल्हाद मिसाळ, उमाकांत आढाव, प्रमोद मिसाळ, काशिनाथ दुतोंडे, गणेश तावडे, सुरेश दुतोंडे, विश्वनाथ मिसाळ, मधुकर दुतोंडे, अंबादास तावडे, ताराचंद दुतोंडे, प्रभाकर आढाव, रमेश राऊत, जगन तावडे, रामदास तावडे, शिवनाथ दुतोंडे, मनेश राऊत, सतीश मिसाळ, संतोष मिसाळ, नागेश मिसाळ, दिनेश मिसाळ, नंदू आढाव, राम बनसोड, सचिन शेरकर, सतीश वाघ, बाळू शेरकर, सागर माठे, सुमित प्रधान, सोमनाथ दुतोंडे, रमेश मिसाळ, गणेश मिसाळ, कृष्णा दुतोंडे, अर्जुन राऊत, मधुकर तावडे, पवार साहेब, गजानन तावडे, सतीश मिसाळ, रामेश्वर तावडे, मनोज मिसाळ, योगेश खैरे, शिवा तावडे, शरद रोठे, राजू वाळके, उमेश मिसाळ, गंगाधर तावडे, बाळू तावडे, दीपक राऊत, अमोल राऊत, अर्जुन दुतोंडे, अजय पाडळकर, विजय पाडळकर, जगदीश गोंडाळे, कृष्णा मिसाळ, सतीश ढंगारे, अक्षय आढाव, मजहर सय्यद, बंडू गंधे, उदय वाडेकर, विशाल मिसाळ, शिवा दूतोंडे, नितीन मिसाळ, नवाब पटेल, सचिन शेरकर, बाळू शेरकर तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतीच्या वीजपुरवठ्यासाठी महावितरणची धडक मोहीम

## सात दिवसात ७८६७ नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर बदलले

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** राज्यातील वीज ग्राहकांचा विशेषतः शेतीसाठीचा वीजपुरवठा विस्कळीत होऊ नये यासाठी उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने नादुरुस्त रोहित्रे (ट्रान्सफॉर्मर) बदलण्यासाठी दिलेल्या आदेशानुसार महावितरणने केवळ ७ दिवसात ७८६७ नादुरुस्त वितरण रोहित्रे बदलली आहेत.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी हा विषय गांभीर्याने घेऊन तातडीने स्वतः सर्व संबंधित अधिकाऱ्यांना व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे त्वरित कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. तसेच महावितरणचे संचालक (संचलन) संजय ताकसांडे यांनी दिवसरात्र पाठपुरावा करून कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या टीमवर्कच्या आधारे राज्यातील ७८६७ नादुरुस्त रोहित्रे बदलण्याचे काम पूर्ण केले.

एका विशेष कृती आराखड्याच्या अंतर्गत नादुरुस्त वितरण रोहित्रे बदलण्याची मोहीम राबविण्यात आली. त्यासाठी महावितरण मुख्य कार्यालयातर्फे क्षेत्रीय कार्यालयांना मुबलक प्रमाणात ऑइल उपलब्ध करून देण्यात आले. रोहित्र दुरुस्त करणाऱ्या एजन्सींनाही तातडीने रोहित्रे दुरुस्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या. २९ नोव्हेंबर २०२२ रोजी राज्यात नादुरुस्त असलेल्या एकूण ६०९८ वितरण रोहित्रांपैकी ७ डिसेंबर २०२२ पर्यंत ५९१७ वितरण रोहित्रे बदलण्यात आली आहेत. याशिवाय २९ नोव्हेंबर २०२२ नंतर नादुरुस्त झालेल्या रोहित्रांपैकी १९५० रोहित्रेही महावितरणतर्फे बदलण्यात आलेली आहेत.

इतक्या कमी कालावधीत मोठ्या प्रमाणावर नादुरुस्त रोहित्रे बदलण्याची ही पहिलीच वेळ असून रोहीत्र नादुरुस्त होताच ते लवकरात लवकर बदलण्यासाठी महावितरण विशेष नियोजन करत आहे. नादुरुस्त वितरण रोहीत्रे बदलण्यासाठी रोहित्रांची मुबलक उपलब्धता असावी यासाठी नादुरुस्त असलेले रोहित्रे त्वरीत दुरुस्त करण्याच्या सूचनादेखील विजय सिंघल यांनी दिल्या आहेत.



# वैजापूर तालुक्यातील 36 हजार 87 मतदार मतदानाचा हक्क बजावणार

## ग्रामपंचायत निवडणूक : 25 ग्रामपंचायतीत रणसंग्रामास सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**अझर शेख**

**वैजापूर :** तालुक्यातील 25 ग्रामपंचायतींचा निवडणूकीचा ऐन थंडीत धुराळा उडाला आहे. 28 नोव्हेपासून नामनिर्देशन पत्र दाखल करायला सुरुवात झाली होती. वैजापूर येथील नवीन तहसील कार्यालयात नामनिर्देशन स्वीकारायला प्रशासनाने सोय केली होती.यात तालुक्यातील 25 ग्रामपंचायतींचे एकूण 36 हजार 87 नागरिक मतदानाचा हक्क बजावणार आहे. यात पुरुष मतदार 19 हजार 108 तर महिला मतदार 16 हजार 729 आपले हक्क बजावतील. 25 ग्रामपंचायतींच्या निवडणूकीत 77 प्रभाग संख्या तर 215 सदस्य राहणार आहे. 77 मतदार केंद्र असेल अशी माहिती सूत्रांनी दिली. यामुळे थंडीत गावातील राजकारण चांगलेच तापले आहे. सरपंच पदासाठी अनेक इच्छुक अर्ज दाखल करताना दिसले .ज्या ठिकाणी सरपंच आरक्षित आहे त्याठिकाणी सदस्यांचा उपवर डोळा बघायला मिळत आहे. यामुळे चुरशीची लढत ग्रामीण भागात दिसत आहे .जनता थेट जनतेतून सरपंच निवडनार यामुळे गावपुढारी चांगल्या व विकास करणाऱ्या नागरिकालाचा पसंती देऊन सरपंच पदाचा अर्ज करण्यास लावत होते. अनेक गावातील नेते बदलले मात्र विकास जैसे ते.यामुळेच नागरिक ही हुशार झाले. विकास करणाऱ्याला प्राधान्य देत आहे. यामुळे गावाचा विकास रखडनार नाही असे नागरिकांना वाटते. कारण एकदा सरपंच झाल्यावर ते लवकर बदलता येणार नाही.

**25 ग्रामपंचायतींचे सरपंच आरक्षण..**

1)डागपिंपळगाव / स.सा.स्त्री
2)भग्गाव/सर्वसाधरण
3)महालगाव/ ना.मा.स्त्री
4) पानवी बुद्रुक-वक्ती,/स.सा.स्त्री
5)अव्वलगाव-हमरापूर/ सर्वसाधरण
6)बेलगाव/ना.मा.प्र
7)बाबतारा/ना.मा.प्र
8 )गोळवाडी-मीरकनगर/सर्वसाधरण
9)हनुमंतगाव सर्वसाधरण
10)हिंगने-कन्नड/ सर्वसाधरण
11)हिलालपूर-कोरडगाव /सर्वसाधरण
12)कनकसागज /स.सा.स्त्री
13)कवीटखेडा-बिरोळा/ना.मा.प्र
14)कोल्ही/अ.जा.स्त्री
15)खरज-तितरखेडा/ सर्वसाधरण
16)खिर्डि-हरगोविंदपूर/ सर्वसाधरण
17)माळीघोगरगाव/ ना.मा.प्र
18)नादी/सर्वसाधरण
19)नांदूरढोक-बाभुळगावगंगा/अ.जा.स्त्री
20)पाराळा/स.सा.स्त्री.
21)पुरणगाव/ना.मा.स्त्री
22)रोटेगाव /स.सा.स्त्री
23)टूणकी-दसकुली/अ.जमाती
24)तिडी-मकरमतपूरवाडी/स.सा.स्त्री
25)वांजरगाव / सर्वसाधरण

## 25 पैकी 10 ग्रामपंचायती जाणार महिलांच्या हाती

वैजापूर तालुक्यातील 25 ग्रामपंचायतींची निवडणूक होणार आहे . 28 नोव्हेंबर पासून नामनिर्दशन अर्ज दाखल सुरुवात झाली होती . तालुक्यातील 25 ग्रा.पं. पैकी 10 ग्रामपंचायती निवडणूकित सरपंच पदाच्या 10 जागा वेगवेगळ्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित असल्याने या ग्रामपंचायतींचा कारभार महिलांच्या हाती जाणार आहे . त्यामुळे सरपंचपद आरक्षित असेल . यात तालुक्यातील डागपिंपळगाव, कनकसागज, पानवी-बुद्रुक -वक्ती, पाराळा, तिडी-मकरमतपूरवाडी, रोटेगाव (स.सा,स्त्री), महालगाव, पुरणगाव (ना.मा.प्र.स्त्री), नांदूरढोक/ बाभुळगावगंगा, कोल्ही( अ.जा.स्त्री) असे 10 ग्रामपंचायतीवर महिलाराज असेल.



**थेट जनतेतुन सरपंचाची निवड...**
जनतेमधून सरपंच निवडला जाणार यामुळे गावात चांगलीच चुरस पहायला मिळत आहे .थंडीत गावातील राजकारण चांगलेच तापले आहे .29 नोव्हे पासून उमेदवारीअर्ज दाखल व्हायला सुरुवात झाली आहे .यामुळे सरपंच पदासाठीच रस्सीखेच होताना दिसत आहे .कारण सरपंच जनतेतून होत आहे .

# ठाकरे सरकारकडूनच कर्नाटक बँकेस झुकते माप!

## भाजपा मुख्य प्रवक्ता केशव उपाध्ये यांचा पलटवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन आणि निवृत्तीवेतन कर्नाटक बँकेमार्फत करण्याच्या आदेशावरून गदारोळ करून विरोधकांनी जनतेमध्ये संभ्रम माजविण्याचा कट आखला आहे. सीमावादावरून सुरू झालेल्या संघर्षात तेल ओतून अशांतता माजविण्याचा हा कट असून, कर्नाटक बँकेसोबत यासंबंधीचा करार ठाकरे सरकारनेच केला होता, ही बाब जाणीवपूर्वक लपविली जात आहे, असा आरोप प्रदेश भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे. यासंदर्भात ८ डिसेंबर २०२१ रोजीच ठाकरे सरकारकडे कर्नाटक बँकेने अर्ज केला होता व २१ डिसेंबर २०२१ रोजी कर्नाटक बँकेसोबतच्या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. तेव्हा राज्यात उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते आणि आज संभ्रम पसरविणारी महाविकास आघाडी सत्तेवर होती, याकडे उपाध्ये यांनी या पत्रकात लक्ष वेधले आहे. कर्नाटक बँकेप्रमाणेच २१ जून २०२२ उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँकेनेही अर्ज केल्यानंतर त्याच तारखेस ठाकरे सरकारने या बँकेसोबत करार केला. महाविकास आघाडी सरकारने बंधन बँक, इक्विटास स्मॉल फायनान्स बँक, करूर वैश्य तसेच साऊथ इंडियन बँकेसही परवानगी दिली होती, असे त्यांनी सांगितले. मुळात, शासकीय निधी केवळ राष्ट्रीयीकृत बँकेतच ठेवण्याबाबत शासनाचे धोरण मार्च २०२० मध्येच निश्चित झाले आहे. त्यानुसार खाजगी बँकेतील वेतन, पेन्शन खाती बंद करून केवळ शासकीय बँकेतच ठेवावी असे स्पष्ट म्हटले होते. मात्र ठाकरे सरकारने या धोरणात खोडा घातला. खाजगी बँकांना मर्यादित प्रमाणात शासकीय बँकिंग व्यवहार हाताळण्याची परवानगी देण्यात यावी, असा आदेश जारी करून महाविकास आघाडी सरकारनेच पुन्हा खाजगी बँकांना परवानगी दिली. आता सीमावादावरून उभय राज्यांत तणाव असताना जनतेमध्ये संभ्रम माजवून तणावाच्या आगीत तेल घालून राजकीय पोळी भाजण्याचा हीन डाव खेळला जात आहे, असा आरोप उपाध्ये यांनी केला.

# तेलंगणात जाण्याची मागणी हे बीआरएस पार्टीचे राजकीय स्टंट : आकाश रेड्डी

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** अधूनमधून राजकीय स्तरावर तेलंगणा राज्यात सीमावर्ती भागातील गावे जोडण्यात यावी ही मागणी महाराष्ट्र व तेलंगणा दोन्हीही राज्याचे लक्षवेधुन घेत होती त्या पार्श्वभूमीवर आज धर्माबाद शासकीय विश्रामगृह येथे सीमावर्ती भागातील सुमारे 22 गावच्या सरपंच/उपसरपंच यांची बैठक बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे सह संपर्क प्रमुख आकाश रेडी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली या बैठकीत उपस्थित सरपंच व त्यांच्या प्रतिनिधीनी आम्ही तेलंगणात जाण्यासाठी उत्सुक नाही ती मागणी निरर्थक व राजकीय स्वार्थापोटी असून आम्ही महाराष्ट्र राज्यातच राहू आमची विकास कामे झाली पाहिजेत अशी मागणी करण्यात आली आहे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या आदेशानुसार सीमावर्ती भागातील गावांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आले असल्याचे यावेळी सहसंपर्क प्रमुख आकाश रेडी यांनी सांगितले. मागे कांही दिवसांपूर्वी देखील ही मागणी झाली त्यास राजकीय आधार मिळाला त्यावेळी मंत्रालयात बैठक झाली व सुमारे 40 कोटींचा निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन मिळाले पण प्रत्यक्षात ती कामे झालीच नाहीत. दरम्यान पुन्हा एकादा ही मागणी जोर धरू लागली एका बाजूला तेलंगणातुन व्यूहरचना आखली जात असतानाच राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी ही गावे विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काय करता येईल यासाठी सकारात्मकता दाखवली असल्याने सीमावर्ती भागातील गांवांचे सरपंच /उपसरपंच मुख्यमंत्री महोदयांच्या कर्तव्यदक्षतेने चांगलेच भारावले




आमच्या मागण्या सोडवण्यासाठी महाराष्ट्र शासन सक्षम आहे आम्ही हक्काने आमच्या सरकारला भांडु पण तेलंगणा राज्यात जाण्यासाठी होत असलेल्या मागणीचे कदापी समर्थन करणार नाही तेथील राज्यकर्त्यांनी आमच्या भावनांचा राजकीय भांडवल करू नये अशी जळजळीत एकमुखी प्रतिक्रिया देखील उपस्थित सरपंच/उपसरपंच यांनी केली . ही मागणी होतेच कशी असाही प्रतिप्रश्न करण्यात आले आहे .

आमच्या परिसरातील व गावातील मुलभूत विकास कामे करा आम्ही महाराष्ट्र राज्यातच राहणार आहोत तेलंगणात जाण्यासाठी उत्सुक नाही अशी प्रांजळ प्रतिक्रिया यावेळी त्यांनी दिली. सदरील बैठकीला पिंपळगाव,अतकूर, संगम, चिंचोली, बाभळी, बेलूर खुर्द, बेलूर बु,पाटोदा, येवती, आलूर, बाभुळगाव,माष्टि, धानोरा, दिग्रस ,नायगाव, येताळा, बामणी (थडी) यांच्या सह सुमारे 22 गावातील सरपंच/उपसरपंच किवां त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. तालुक्यातील सरपंच संघटनेचा कार्यकाळ संपुष्टात आला व विद्यमान सरपंच किंवा उपसरपंच संघटना यांच्यावतीने अशी कोणतीही मागणी करण्यात आली नाही आमच्या संघटनेचा आधार घेऊन जे कोणीही महाराष्ट्र सोडुन जाण्यासाठी तयार आहेत ती कदाचित त्यांची व्यक्तीगत प्रतिक्रिया असेल आम्ही विकासासाठी मागणी करीत आहोत तेलंगणा राज्यात जाण्याची नाही ,अखंड महाराष्ट्र एकसंघ राहिला पाहिजे अशी आमची भूमिका आहे असेही यावेळी स्पष्टपणे सांगण्यात आले.

तेलंगणा च्या राज्यसभेच्या खासदार निधीतून कामे करण्याचे आश्वासन दिले गेले पण प्रत्यक्षात त्या भागातील निवडणूक संपली की सोयीस्कर पणे हा विषय बाजूला सारल्या गेला. त्या राज्यातील निवडणूक प्रचारासाठी आमच्या भावनांचा वापर केला जात असल्याचा आरोप देखील यावेळी करण्यात आला.

जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा सौ.पदमारेडी सतपलवार यांच्या नेतृत्वाखाली मागिल काळात सुमारे 17 कोटि रुपयांची कामे करण्यात आली. विकासासाठी मुबलक निधीची आवश्यकता असुन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून तो निधी उपलब्ध करून आणू,खासदार हेमंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली सरपंच व मुख्यमंत्री यांची भेट व बैठक लवकरच होणार असुन त्यावेळी विकासासाठी आवश्यक त्या निधीची मागणी करण्यात येणार असल्याचे यावेळी सह संपर्क प्रमुख आकाश रेडी यांनी सांगितले.

सदरील बैठकीत बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे सतिष पाटील शिंदे,व्यंकट मुमोड,अनील कमलाकर,दिगम्बर जगदंबे, संतोष पाटील मोरे,गोरख नुत्तीवाड यांच्यासह कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# महापरिनिर्वाण दिनी ६५ अशोकचक्र हाराने अभिवादन; अक्षर कार्यशाळेचा उपक्रम



आधुनिक केसरी न्यूज

**महेंद्र बोराळे**

**कंधार :** कंधार म्हटले की,प्रथम आठवते ती चळवळ माजी खासदार व आमदार, ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी ,विविध सत्याग्रहाचे निर्माते डॉ.भाई केशवरावजी धोंडगे यांनी चळवळीच्या माध्यमातून कंधारचे नाव ठळक केले आहे. झाले आहे. सध्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमातून आपला वेगळा ठसा कंधार शहरात उमटला आहे. ऐतिहासिक कंधार शहरातील नगर परिषदेच्या प्रांगणातील, दलितोध्दारक, भारतीय संविधान ग्रंथ राजाचे संविधानकार, अर्थतज्ञ, विचारवंत, वैचारिक खजिना, विश्वस्तरीय ग्रंथवाचक,अलौकिक ग्रंथसंपदा निर्मितीकार बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास ६५ व्या महापरिनिर्वाण दिनी ६५ अशोक चक्र असलेला अशोकचक्रहार, कोरोना महासंकटात भाऊचा डबा हा सामाजिक मानवतेचा उपक्रम अखंडीत राबवणारे अन् अनेकानेक गरजुंना मदत करुन आधार देणारे, श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी कंधारचे युवा अध्यक्ष, माजी जि.प.सदस्य प्रा.डॉ. पुरुषोत्तम केशवराव धोंडगे यांच्या समर्थ हस्ते बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंबेडकर यांना अर्पण करुन अनोखे अभिवादन करण्यात आले.हा अनोखा उपक्रम मला वाटते महाराष्ट्र राज्यात नव्हे देशातप्रथमच होत आहे.सुंदर अक्षर कार्यशाळा कंधार या टोपण नावाने सुलेखनकार गोपाळसुत दत्तात्रय एमेकर गुरुजी,क्रांतिभुवन बहाद्दरपुरा हे वैविध्यपूर्ण उपक्रम राबविण्यात त्यांचा हातखंड आहे.या प्रसंगी वकिल बांधव, नगराध्यक्ष प्रतिनिधी, नगरसेवक शाहूभाऊ नळगे, नगरसेवक डॉ. दीपक बडवणे, पत्रकार सिकंदर भाई, संपादक माधवराव भालेराव,कांबळे, बापुराव वाघमारे,पत्रकार बोटेवाड, प्रा. गरुडकर, बालाजी परोडवाड, अभंग लोखंडे,आदीसह सर्वजण अभिवादन करण्यासाठी उपस्थित होते.

# कृषि प्रदर्शनाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** येथे कृषी विभागाच्या वतीने सिल्लोड येथे दि १ ते ५ जानेवारी २०२३ रोजी पहिले राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन भरत आहे. यावेळी प्रथमच राज्यातील चारही कृषी विद्यापीठ व महाबीज अकोला हे सहभाग घेणार आहेत. त्यामुळे विद्यापीठाचे नवनवीन संशोधित वान, आधुनिक कृषी यांत्रिकीकरण, ठिबक सिंचन प्रणाली, शेतीतील नवनवीन प्रयोग शेतकऱ्यांना पाहायला मिळतील. तसेच शेतीला जोडव्यवसाय जसे की पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन इत्यादि विषयी मार्गदर्शन मिळणार आहे . विद्यापीठाने संशोधित केलेले उच्च उत्पादनक्षम फळाच्या जाती, लागवड पद्धती, विक्री व्यवस्थापन याची माहिती मिळेल. शेतात वापरले जाणारे आधुनिक यंत्रसामग्रीही येथे पाहायला मिळणार आहे. शेतकरी बंधू तिथे खरेदी सुद्धा करू शकतात. तसेच इतर आंतरराष्ट्रीय कंपन्या देखील भाग घेणार आहेत. त्यावेळेस शेतकऱ्यांचे चर्चासत्र भरविले जातील व शेतकरी ते शास्त्रज्ञ चर्चा घडवून आणली जाईल. शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यात येईल व त्यांना अचूक माहिती दिली जाईल. त्यासाठी तालुका कृषी अधिकारी सोयगाव यांच्या वतीने सोयगाव तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा दिनांक एक जानेवारी ते पाच जानेवारी 2023 मध्ये लाभ घ्यावा असे जाहीर आवाहन कृषि अधिकारी एस जि वाघ यांनी केले.




# माजी सैनिक काशिनाथ कोकरे यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**धामोरी (खुर्द) :** येथील माजी सरपंच तथा माजी सैनिक काशिनाथ कोकरे यांचे काल दिनांक 08 डिसेंबर २०२२ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. कोकरे यांनी 17 वर्ष लष्करामध्ये सेवा केली. त्यानंतर लष्करातून निवृत्ती झाल्यानंतर एसटी महामंडळामध्ये 15 वर्ष सेवा केली व एसटी महामंडळातून निवृत्त झाल्यानंतर ते 2014 ते 2019 या कार्यकाळात धामोरी खुर्द गावाचे सरपंच होते. त्यांच्या पश्चात पत्नी,1 मुलगा,1 मुलगी, नातवंडं , 4 भाऊ, पुतणे,सुना, असा मोठा परिवार आहे. लष्करात सेवेत असताना ते प्रवास करीत असलेल्या वाहनाचा बर्फ ढासळल्याने अपघात झाला होता. त्यामध्ये त्यांच्या सोबतच्या इतर सैनिकांना वीज मरण आले होते.कोकरे हे जवळपास 24 तास बर्फामध्ये दबलेले होते त्यावेळी त्यांना हेलिकॉप्टरद्वारे लिफ्ट करून हॉस्पिटलला दाखल करण्यात आले होते. अवघे 61 वर्ष आयुष जगलेले कोकरे यांनी आयुष्भर देशाची व समाजाची सेवा केली. काशिनाथ कोकरे हे गाव व परिसराचे भूषण होते.

# फ्रेंड्स ऑफ बीजेपी अभियानाच्या मराठवाडा संयोजकपदी सुहास दाशरथे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शहरातील प्रगल्भ, संयमी पण वेळप्रसंगी तेवढेच आक्रमक राजकीय व्यक्तीमत्व अशी ओळख असलेल्या सुहास दाशरथे यांची भाजपच्या 'फ्रेंड्स ऑफ बीजेपी' या अभियानाच्या मराठवाडा संयोजक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.
तसे नियुक्ती पत्र भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते त्यांना भाजप प्रदेश कार्यालय, मुंबई येथे देण्यात आले,सध्या भाजपच्या वतीने राज्यभरात 'फ्रेंड्स ऑफ बीजेपी'अभियान राबविण्यात येत आहे,या अभियाना अंतर्गत मराठवाडा तसेच संपूर्ण राज्यभरात 'सोशल मीडिया वारीअर्स' तयार करण्याची, नियुक्त करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.
राज्याचे लाडके उप मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून फ्रेंड्स ऑफ बीजेपी या अभियानाची सुरवात करण्यात आली आहे,या माध्यमातून राष्ट्र भक्तीने भरलेला,डॉकटर,वकील,साहित्यिक अशा प्रबुद्ध नागरिकांच्या वर्गाला भारतीय जनता पार्टी बद्दल आत्मीयता आहे पण तो पक्षाच्या दैनंदिन कार्यक्रमात सहभागी होऊ शकत नाही,अशा नागरिकांना "फ्रेंड्स ऑफ बीजेपी" या अभियानातून पक्षाशी जोडून घेतले जाईल व या अभियानातून दोन कोटी नागरिकांना पक्षाला जोडण्यात येणार आहे.
बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार १९८४ पासून शिवसेनेतून



आपल्या राजकीय कार्याला प्रारंभ करणारे सुहास दाशरथे औरंगाबादच्या राजकीय, सामाजीक क्षेत्रात 'सुहास भाऊ' या नावाने ओळखल्या जातात.
'कोरोना' काळात औरंगाबादकरांसाठी त्यांनी कोणीही विसरू शकणार नाही, असे कार्य केले. त्यांनी गरज वंतांच्या घरोघरी जाऊन अन्न व औषधं पुरविण्याचे, रुग्णालयीन मदत करण्याचे अविस्मरणीय कार्य केले. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख, शहरप्रमुख राहिलेले दाशरथे यांनी मध्यंतरी 'मनसे' प्रवेश करत औरंगाबादकरांच्या मुलभूत सोयी-सुविधांसाठी प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले होते. त्यावेळी त्यांनी औरंगाबादच्या रस्त्यांवरील खड्यांबाबत केलेल्या अनोख्या आंदोलनाने औरंगाबादकरांची मने जिंकली होती.
आपल्या राजकीय संघटन कौशल्याने औरंगाबाद 'मनसे'ची चांगली बांधणी करत त्यांनी औरंगाबाद 'मनसे'ला राजकीय दृष्ट्या चांगला चेहरा दिला होता, भक्कम स्थितीत आणले होते. त्यांच्या काळात त्यांनी 'मनसे' केलेले कार्य पाहून औरंगाबादकर 'मनसे'कडे एक चांगला, सशक्त राजकीय पर्याय म्हणून पहायला लागले होते.
पण शिवसेने प्रमाणेच 'मनसे'तही त्यांच्यावर अन्याय झाल्याने सात महिन्या पूर्वी केंद्रीय वित्त राज्य मंत्री डॉ भागवत कराड, सहकार मंत्री अतुल सावे, तत्कालीन भाजप शहर अध्यक्ष संजय केनेकर व आताचे शहर जिल्हा अध्यक्ष शिरीष बोराळकर यांच्या माध्यमाने उप-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन भाजपात प्रवेश केला.
त्यांचे राजकीय, सामाजीक कार्य, कौशल्य लक्षात घेऊन पक्षाने त्यांना ही जबाबदारी दिल्याचे कळते. आपल्या या नियुक्ती बद्दल त्यांनी उप-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे,केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब दानवे पाटील, डॉ.भागवतजी कराड,डॉ.सहकार मंत्री अतुल सावे, हरिभाऊ बागडे,संजय केनेकर,शिरीष बोराळकर आदींचे आभार मानले.
आज भाजप विभागीय कार्यालयात संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष शिरीष बोराळकर यांच्या वतीने आज सुहास दाशरथे यांचा सत्कार देखील करण्यात आला.



# रासेयो राज्य सल्लागार समितीवर किशोर शितोळे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त माजी सदस्य किशोर शितोळे यांची राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय सल्लागार समितीवर सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने गुरुवरी (दि.आठ) शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. आम्ही तीन वर्षासाठी सल्लागार समितीची पुर्नरचना करण्यात आली असून उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील या समितीचे अध्यक्ष आहेत. कुलगुरू डॉ प्रमोद येवले हे या समितीचे सदस्य असणार आहेत. किशोर शितोळे हे माजी व्यवस्थापन परिषद सदस्य असून देवगिरी बँकेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. तसेच 'जलदूत' या स्वयंसेवी संस्थेमार्फत त्यांनी जलसंधारणासंदर्भात कार्य केले आहे. या नियुक्तीबद्दल किशोर शितोळे यांचे डॉ.प्रशांतकुमार वनंजे, (राज्यसंपर्क अधिकारी, रासेयों कक्ष मंत्रालय) व विद्यापीठ रासेयो संचालक डॉ. आनंद देशमुख यांनी अभिनंदन केले आहे.




# राज्यपाल हटावो... एमआयएम अक्रामक

## क्रांतीचौक परिसर छत्रपती शिवाजी महाराज की जयने दुमदुमला...

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** विविध पक्ष व संघटनेनंतर राज्यपाल भगतसिंग कोश्यारी हटावो या मागणीसाठी आता एमआयएम रस्त्यावर उतरली आहे. चार वाजता क्रांतीचौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्यासमोर शहराध्यक्ष शारेक नक्शबंदी यांच्या नेतृत्वाखाली तीव्र निषेध धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी राज्यपाल व भाजपाच्या विरोधात घोषणाबाजी केली. राज्यपाल हटावो महाराष्ट्र बचावो, भाजपा हटावो देश बचावो, राज्यपाल कोश्यारींचे करायचे काय....अशा घोषणा दिल्या.
छत्रपती शिवाजी महाराज हे राज्याचे अराध्य दैवत आहे. राज्यपाल व भाजपाचे वाचाळवीर नेते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल अपशब्दांचा वापर करुन महाराष्ट्राच्या जनतेचा अपमान करत आहे ते आम्ही सहन करणार नाही. राज्यपालांना परत पाठवा. छत्रपती शिवाजी महाराज हे कोणी एका समाजाचे नसून सर्व त्यांचे आदर सन्मान करतात. कोणत्याही समाजाच्या महापुरुषांचा अपमान सहन केला जाणार नाही असे शहराध्यक्ष शारेक नक्शबंदी यांनी यावेळी सांगितले.
याप्रसंगी आंदोलनात एमआयएमचे नेते नासेर सिद्दीकी, जिल्हाध्यक्ष समीर साजिद बिल्डर, शेख अहेमद, गंगाधर ढगे, विकास एडके, दादासाहेब काकडे, संदीप सरीन, आरेफ हुसेनी, सलिम सहारा, फेरोज खान, रफत यारखान, रफीक खान, शेख शोएब, शोएब खान, इम्तियाज भाई, सुमीत जमधडे, शेख मुबीन, शेख अक्रम, हाजी समीर कुरेशी व शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.


# बी.टेकचे शिक्षण घेणाऱ्या एकवीस वर्षांच्या विद्यार्थ्याची उद्योगाकडे वाटचाल

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शहरातील 21 वर्ष वय असलेले बी.टेक कम्प्युटर मध्ये शेवटच्या वर्षात शिकणाऱ्या सय्यद साजिद या विद्यार्थ्यांने जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर जालना शहरातील चंदनझिरा परिसरात स्वतःचे SMTECHS पावर युएसबी केबल बणवण्याचा छोटा कारखाना सुरू करुन उद्योगाला सुरुवात केली.
मौज मजा करण्याच्या या वयात आजोबांनी दिलेल्या हिमतीवर अनेक जणांना रोजगार मिळवून देण्यासाठी दिमाखदार योजना आखली.
वडीलांचे छत्र नसताना नातेवाईकांचे टोमने खावून खावून संकल्प केला. जीवनात परिश्रम घेत मागे न बघता पुढे जायचे असा ध्येय बाळगून गगन भरारी घेतली. नवीन तंत्रज्ञानाची कास धरत अकरा महीने अगोदर छोट्याशा जागेवर एक मशिनने कम्प्युटर केबल व लैपटॉप



केबल बणवण्यास सुरुवात केली.
आज पर्यंत याच्याशी 15 ते 20 डिस्ट्रीब्युटर जोडले गेले आहेत, यातून संपूर्ण देशभरात आपले पावर केबल सप्लाय करण्यासाठी तो सतत प्रयत्नशील असतो. कच्चा मटेरियल कोठून आणायचे व पैकींग कशी करायची सर्व स्वतः करुन आज बाजारपेठेत त्याने बणवलेल्या केबलची मागणी वाढली आहे.
आज पर्यंत कित्येक तरुणांना येथुन रोजगार उपलब्ध झाला आहे.
महीन्याला लाखोंच्या घरात व्यवसाय सुरू झाला. लाखोंचा व्यवसाय कसा कोट्यवधीत करता येईल यासाठी तो नेहमी प्रयत्नशील असतो.
साजिदचे प्राथमिक शिक्षण ऑक्सफर्ड स्कूल जालना येथे झाले तर अकरावी व बारावीचे शिक्षण औरंगाबाद येथील डीएफसीत झाले आहे. औरंगाबाद शहरातील एमआयटी इंजिनीअरिंग कॉलेज येथे बी.टेकचे शिक्षण सुरू आहे. आई श्रीमती शमीम बी व आजोबा दौलतखान पठाण यांनी पालन पोषण करत मोठे केले. आई व आजोबांना जीवनात काही तरी प्रगती करुन नवीन करुन दाखवण्याची जिद्द व चिकाटी बाळगली. एवढ्या लहान वयात व्यवसायात भरारी घेणाऱ्या साजिद सय्यदचे औरंगाबाद आणि जालना जिल्ह्यात कौतुक केले जात आहे.
एका कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी साजिदचे कौतुक करत सांगितले की या वयात एवढी भरारी करणारे साजिदचा आदर्श सर्वच युवकांनी घेण्यासारखे आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# एमआयटी सरव्यवस्थापकाचे घर फोडले; १२ तोळे सोने, अर्धाकिलो चांदी लंपास

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** एमआय टी महाविद्यालयाच्या व्यवस्थापकाचे बंद घर मंगळवारी (६/१२) फोडून १२ तोळे सोनं , अर्धाकिलो चांदी व २८ हजार रु रोख रु असा एकूण ६लाख ५० हजारांचा मुद्देमाल चोरटयांनी लंपास केला या प्रकरणी सिडको औद्योगिक पोलिस ठाण्यात रात्री ११वा गुन्हा दाखल झाला. जरीन आसिफअली रामाणी (७२) रा. एन १ सिडको गोल्डन अपार्टमेंट यांचे घर फोडले. जरीन या एम.आय. टी महाविद्यालयात सरव्यवस्थापक या पदावर काम करतात त्याचे दीराचे निधन झाल्यामुळे त्यांचे पती राजकोट ला गेले होते.पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली त्यांच्या म्हणण्यानुसार चोराने रामाणी यांच्या तिसऱ्या मजल्यावरील घराची लॅच की उघडून घरात प्रवेश केला. मजूरीण ११.३०वा. येऊन गेली व दुपारी १२ ते ५ या वेळेत गुन्हा घडला गुन्हेशाखेचे पीएसआय कल्याण शेळके घटनास्थळी जाऊन आले त्यांनी रामाणी यांच्या कडे असलेल्या मजूरणीची चौकशी केली पण फिर्यादी रामाणी यांनी पोलिसांना सांगितले की, ती त्यांच्या कडे गेल्या १३ वर्षांपासून काम करते चोरट्याने दिवाणखाली असलेल्या कपाटाच्या किल्ल्या घेऊन कपाट उघडले व चोरी केली पोलिसांना मिळालेल्या सी,सी,टीव्हीही फुटेज मध्ये चोर दिसत नाहीत घटनास्थळी पोलिसनिरीक्षक गुन्हेशाखा अविनाश आघाव , सिडको औद्योगिक पोलीस ठाण्याचे निरीक्षक विठ्ठल पोटे यांनी भेट दिली पुढील तपास पोलीस करत आहेत.